## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये



Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
DERMATOLOGY | NURSING
PANCHAKARMA
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५० वा | मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR






15 जानेवारी 2026 | सकाळी 7:30 ते संध्याकाळी 5:30

## भाजपाला मतदान करून प्रचंड बहुमतांनी विजयी करा

प्रकाशक : भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र, सीडीओ बॅरेक्स 1, एलआयसी कार्यालयासमोर, नरिमन पॉइंट, मुंबई - 400021

## संपादकीय

# सोलापूरकरांनो, सावधान! रात्र वैऱ्याची आहे!

सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक निवडण्यासाठी मतदान वेळ जवळ येत असताना शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. रस्त्यांवर पोस्टर्स, सोशल मीडियावर घोषणा, गल्लीगल्लीत सभा, पदयात्रा आणि आश्वासनांचा पाऊस सुरू आहे. पण या गदारोळात एक गंभीर सत्य दुर्लक्षित राहू नये ही रात्र सोलापूरच्या भवितव्याची आहे आणि ती वैऱ्याची असण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिका निवडणूक म्हणजे केवळ नगरसेवक निवडण्याची प्रक्रिया नाही, तर पुढील पाच वर्षे शहर कसे श्वास घेईल, कसे वाढेल आणि कसे वाचेल याचा निर्णय असतो. दुर्दैवाने सोलापूरचा अनुभव सांगतो की निवडणूक संपल्यानंतर आश्वासनांची भाषा बदलते, नागरिकांचा आवाज दुर्लक्षित होतो आणि सत्ता ही सेवेसाठी नव्हे, तर सोयीसाठी वापरली जाते.

या निवडणुकीत अनेक जुने चेहरे नव्या घोषणांसह समोर आले आहेत. काहींनी पक्ष बदलले, काहींनी विचारधारा बदलली, तर काहींनी केवळ झेंडा बदलून स्वतःला 'नवीन' दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रश्न उमेदवार कोण आहे, यापेक्षा तो कोणासाठी उभा आहे, हा अधिक महत्त्वाचा आहे. सोलापूरकरांनी आजवर पाणी, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर खूप सहन केले आहे. तरीही निवडणूक आली की भावनिक मुद्दे, जाती-धर्माचे गणित, वैयक्तिक टीका आणि अफवांचे राजकारण पुढे येते. हीच ती रात्र आहे जिथे सजग नसलो, तर शहराची वाट लागते. महानगरपालिका निवडणुकीत पैशाचा वापर, प्रलोभने, दबावतंत्र, सोशल मीडियावरून दिशाभूल करणारी माहिती हे सगळे नव्याने नाही. पण यावेळी त्याची तीव्रता अधिक आहे. 'आपलाच माणूस', 'काम करून दाखवले आहेद्ध अशा घोषणा ऐकायला गोड वाटतात, पण मागील कारकिर्दीचा हिशेब मागितल्याशिवाय विश्वास ठेवणे म्हणजे स्वतःच्या भविष्यासोबत फसवणूक ठरू शकते.

मतदार जर गाफील राहिला, तर सत्ता अशा लोकांच्या हाती जाईल ज्यांचा सोलापूरशी संबंध निवडणुकीपुरताच असतो. निवडणूक जिंकल्यावर जे अदृश्य होतात, त्यांच्यापासून सावध राहण्याची हीच वेळ आहे. मतदानाच्या आधी प्रत्येक उमेदवाराला प्रश्न विचारा, मागील पाच वर्षांत काय केले? प्रभागासाठी ठोस आराखडा काय आहे? केवळ घोषणा की निधी आणि नियोजन? स्वच्छ कारभाराची हमी कोण देतो? ज्या शहराने उद्योग, शिक्षण, संस्कृती आणि कष्टकरी वर्गाच्या बळावर ओळख निर्माण केली, त्या सोलापूरला पुन्हा एकदा प्रयोगशाळा बनवू देणे परवडणारे नाही.

जर यावेळीही मतदार भावनेला बळी पडला, तर पुढील पाच वर्षे केवळ तक्रारी, आंदोलनं आणि पश्चात्ताप याशिवाय हाती काहीच राहणार नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते, सोलापूरकरांनो, सावधान!

ही रात्र स्वप्नांचीही असू शकते... पण गाफील राहिलो, तर नक्कीच वैऱ्याची ठरेल!

मतदान करा, पण डोळे उघडे ठेवून. निवडा पण शहराच्या भविष्यासाठी.

# एकच वारी बारा जानेवारी

स्वराज्य संकल्पिका- राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त विनम्र अभिवादन व आपणास लाख लाख सदिच्छा स्वराज्याच्या इतिहासाच्या प्रत्येक पाणावर सुवर्ण अक्षरांनी कोरलेलं नाव म्हणजे जिजाऊ!!

शिवरायांच्या पराक्रमाच्या प्रत्येक प्रसंगाचा साक्षीदार म्हणजे जिजाऊ !!

शहाजीराजांच्या संकल्पनेतील स्वराज्य निर्मितीचा मुख्य शिल्पकार म्हणजे जिजाऊ !!

आया बहीणींच्या आर्त किंकाळ्या थांबविण्यासाठी पोटच्या मुलासह संपुर्ण कूटुंब पणाला लावणाऱ्या महान स्त्री म्हणजे जिजाऊ !!

शेतकरी, कास्तकरी यांच्यावरील अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी स्वतःचे संपुर्ण आयुष्य वेचणाऱ्या राजमाता म्हणजे जिजाऊ !!

रयतेच्या सुखासाठी रयतेचं राज्य बनविणाऱ्या राष्ट्रमाता म्हणजे जिजाऊ !! किती वर्णन करावं तितकं कमीच आहे, शब्दकोष अपुरे पडावेत असं सह्याद्री एवढं महान कार्य करणाऱ्या जिजाऊ म्हणजे या भूतलावरिल स्त्रीत्वाचा आदर्श असणारं एकमेवाद्वितिय व्यक्तीमत्व म्हणून राष्ट्रमाता जिजाऊंचा उल्लेख होतो आणि तो शतप्रतिशत सार्थ आहे.

आपण जिजाऊंचा जीवनक्रम पाहीला तर त्यांचा जन्म व बालपण सिंदखेडराजा , बुलढाणा म्हणजे विदर्भ, जिजाऊंच सासर वेरुळ म्हणजे मराठवाडा, जिजाऊंची कर्मभुमी पुणे मावळ म्हणजे पच्छिम महाराष्ट्र, तर जिजाऊंनी रायगड येथे शिवराज्याभिषेकानंतर देह ठेवला तो पाचाड येथे म्हणजे कोकण...

जिजाऊंचा हा जीवन प्रवास पाहीला तर सहज लक्षात येते की संपुर्ण महाराष्ट्र हा जिजाऊ माँसाहेबांच्या वास्तव्याने पुनित व प्रेरित झालेला आहे म्हणूनच चारशे वर्षानंतर आजही महाराष्ट्र सुजलाम सुफलाम, सुरक्षित, आचार विचार आणि संस्काराने पुरोगामी म्हणून ओळखला जातो...



जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेड राजाचे शूर सरदार राजे लखोजी जाधव व म्हाळसा राणीसाहेब यांच्या पोटी झाला. कन्यारत्न झाल्याच्या आनंदात लखोजी राजांनी संपुर्ण परिसरामधे हत्तीवरुन साखर वाटली होती...

जिजाऊंचा जन्म म्हणजे स्वराज्य निर्मितीची ठिणगीच आहे याची कदाचित इतिहासालाही जाणिव नसावी... लखोजी राजांनी मात्र जिजाऊंना मुलांच्या बरोबरीनेच सर्व युद्ध कलांचे शिक्षण दिले, भाषांचे शिक्षण दिले, राजनिती, प्रशासन, न्याय आदी विषयांची पुर्ण माहीती दिली. एवढंच नाही तर सदरेवरही जिजाऊंना घेऊन लखोजीराजे दैनंदिन कामाचा निपटारा करत असत. सदरेवरील कामकाजामुळे जिजाऊंना रयतेवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराची जाणीव झाली, आया बहीणींच्या वेदना पाहून जिजाऊंना सुलतानी संकटांचा पुर्ण अंदाज आला इथेच त्यांनी मनाशी खुणगाठ बांधली की रयतेचं राज्य झालं पाहीजे....

पाहता पाहता जिजाऊ उपवर झाल्या आणि लखोजीराजांनी वर संशोधनास सुरवात केली. अल्पावधितच वेरुळच्या मालोजी राजांची भेट झाली आणि शहाजी राजांशी जिजाऊंचा विवाह निश्चित झाला व १६१० मधे अत्यंत उत्साहात तो पारही पडला. जिजाऊ वेरुळला आल्या मात्र रयतेची परिस्थिती तशीच होती. शहाजी राजांनाही हे मान्य नव्हते. जिजाऊंची अस्वस्थता शहाजी राजांच्या लक्षात आली, अन्याय अत्याचाराचा सल जिजाऊंचं मन पोखरत होता, हे जिजाऊंच दुःख शहाजी राजांनी जाणलं आणि दोघांनी मिळुनच स्वराज्य निर्मितीचा संकल्प केला. मराठा सरदार एकत्र आणून एकमुठ बांधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला फारसे यश आले नाही. मोगल, निजाम, आदिलशहा यांना हुलकावण्या देत स्वराज्य बांधणीची तयारी सुरु होती त्याचे योग्य नियोजन केले होते. स्वराज्य निर्मितीसाठी योग्य जागा म्हणून मावळ प्रांताची निवड केली, तिथे विश्वासातील लोकांच्या नेमणूका केल्या. मावळ व आसपासच्या परिसरात संपर्क वाढवला व माणसांची जमवाजमव केली... या नियोजनबद्ध तयारी दरम्यानच जिजाऊ गरोदर राहील्या, गरोदरपणाच्या नाजुक अवस्थेतही केवळ आणि केवळ स्वराज्य बांधणीचा विचारच जिजाऊंच्या मनात घोळत होता. इतकच नाहीतर डोहाळेही विलक्षण होते. घोडेस्वारी, भालाफेक, दांडपट्टा आदी युद्ध खेळ खेळण्याची इच्छा होत होती... अशा परिस्थितीत गर्भावर संस्कार काय होणार ? स्वराज्य निर्मिती , अन्याय अत्याचाराचा बिमोड हेच संस्कार पोटातल्या गर्भावर होत होते, पोटातील बाळ उद्याच्या स्वराज्याचा निमार्ता असावा अशी मनोकामना बाळगूनच जिजाऊंनी १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी गडावर एका राजबिंड्या मुलास जन्म दिला आणि स्वराज्य निर्मितीचा ध्यास पुर्णत्वाला नेण्यासाठी खऱ्या अर्थाने एका छत्रपतींनाच जन्म दिला... आनंदाचे डोही आनंद तरंग या तुकोबारांयाच्या अभंगाचा अनुभव शिवनेरी गड घेत होताच पण संपुर्ण रयत या भावी छत्रपतींच्या आगमनाने आनंद सागरात डुंबुन गेली होती !!! अर्थात छत्रपती शिवरायांचा जन्म झाला...

आता मात्र जिजाऊ आणि शहाजी राजांचा आत्मविश्वास पुर्ण बळावला. दोघांनी मिळुन पाहीलेले स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार होते.. शिवनेरी, सिंदखेड राजा येथिल दोन वर्षाच्या वास्तव्यानंतर जिजाऊ बाल शिवबांना घेऊन शहाजीराजांकडे बेंगलूर मुक्कामी गेल्या. पुर्वनियोजित योजनेस अनुसरुन शिवरायांच्या शिक्षणास सुरवात झाली. व्यवहारातील प्रचलित सर्व भाषांचे ज्ञान, व्यायाम, युद्ध कला यांचे तज्ञ प्रशिक्षक नेमले गेले. स्वराज्याच्या भौगोलिक कक्षा, नैसर्गिक साधनांचा स्वराजासाठी उपयोग, राजकीय परिस्थिती, प्रशासकीय जबाबदाऱ्या, न्याय निवाड्यांच्या पद्धती, विश्वासू लोकांची जमवाजमव या आणि आशा अनेक बारिकसारीक बाबींचा सखोल अभ्यास शिवरायांकडून करवुन घेतला या प्रत्येक बाबींवर जिजाऊ माँसाहेब व शहाजी राजांचे सुक्ष्म पद्धतीने लक्ष होते तर शिवरायांचे थोरले बंधू संभाजी राजे जातीने सर्वकाही पहात होते...

शिवरायांच्या सुक्ष्मादीसुक्ष्म प्रशिक्षणानंतर त्यांना मावळ प्रांती पुणे येथे धाडण्याचे ठरले, सोबत मोजके सैन्य, प्रशासनातील अनुभवी मंडळी, राजमुद्रा व भगवी पताका यासह शिवरायांची रवानगी नक्की झाली.. अर्थात यासवासीबत अत्यंत महत्त्वाचे म्हणजे जिजाऊ स्वतः शिवरायांसोबत राहून स्वराज्य बांधणीचे काम पाहणार होत्या... शहाजी राजे आदिलशहाचा कारभार पाहण्यासाठी बेंगलूरलाच थांबणार होते.. खुप कठीण निर्णय पण रयतेच्या स्वराज्यासाठी स्वतःच्या कौटुंबिक सुखाची आहुती जिजाऊनी दिली.

१६२९ मधे मुरार जगदेवाने पुणे उद्ध्वस्त करुन तिथे गाढवाचा नांगर फिरवला होता त्यावर बारा फुटी पहार रोवून फाटकी चप्पल, तुटका झाडु, आदी गोष्टी टांगून ही जागा अशुभ असल्याची दवंडी पीटवली होती.. याच अशुभ जागेवर १६४२ मधे जिजाऊंनी शिवबांच्या हातून सोन्याचा नांगर चालवला, पहार काढून टाकली आणि त्याच पुण्यात लाल महल बांधून स्वराज्य निमीर्तीच्या कामास सुरवात केली. जिजाऊंच्या संपुर्ण मार्गदर्शनाखाली शिवरायांचा स्वराज्य स्थापनेचा कारभार सुरु झाला..

जिजाऊंच्या सांगण्यावरुन शिवरायांनी बघता बघता सर्व मावळ प्रांत पींजून काढला आणि आसपासचे गड घेण्यास प्रारंभ केला.. अनेक कठिण प्रसंगाला सामोरं जात शिवरायांनी स्वराज्याची निर्मिती केली. आता मात्र जिजाऊंची फक्त एक इच्छा पुर्ण झाली नव्हती ती म्हणजे शिवरायांचा राज्याभिषेक !! स्वतःचे संपुर्ण आयुष्य चंदनाप्रमाणे झिजविणाऱ्या या महान मातेची ही इच्छा ६ जून १६७४ रोजी पुर्ण झाली. शिवबा सर्वमान्य छत्रपती झाले , रयतेचं स्वराज्य मान्यता पात्र झालं, हे सुख याची देही याची डोळा पाहुन या महान मातेने दि,१७ जून १६७४ रोजी पाचाड मुक्कामी आपला देह त्यागला. अशा या सर्वकलानिपुण राजामातेबद्दल आदर व्यक्त करताना जयराम पींडे या कवीने सार्थ वर्णन केले आहे...

जशी चंपकेशी खुले फुलजाई !
भली शोभलीस ज्यास
जाया जिजाई !!
जिचे किर्तिचा चंबू जंबू द्विपला !
करी साऊली माऊली मुलाला !!

जगातील धाडसी, हुशार, प्रगल्भ, राजनितीज्ञ, भाषातज्ञ, युद्धकला युद्धनिती अशा सर्व गुण संपन्न राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्मोत्सवानिमित्त विनम्र अभिवादन व सर्व जिजाऊ भक्तांना हार्दीक सदिच्छा !!

**प्रशांत पाटील**
विभागीय अध्यक्ष,
मराठा सेवा संघ, महाराष्ट्र
९४२२०६६२९१

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...!!

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वषार्तील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूयार्ने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!



**श्याम ठाणेदार,**
दौंड जि.पुणे
९९२२५४६२९५

# धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी !

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या 14 व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौयार्ने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना ह्यतेगबहादुरद्ध हे नाव दिले, ज्याचा अर्थ ह्यतलवारीचा धनीद्ध असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धमार्चे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर



साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले.

17 व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी 15 रागांमध्ये रचलेले 116 शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन 2025 हे 350 वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक 24 व 25 जानेवारी 2026 रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी 350 वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी 350 वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम 7 डिसेंबर 2025 रोजी साजरा करण्यात आला.

आता दिनांक 24 व 25 जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी 350 वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे 18 व 19 फेब्रुवारी 2026 रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

**अलका पाटील**
उपसंपादक, जिल्हा माहिती
कार्यालय, नांदेड

# राष्ट्रीय युवक सप्ताहानिमित्त व्याख्यानमाला व स्वच्छता अभियानाचे आयोजन

**मेथवडे (कटूसत्य वृत्त):-** भारताचे महान सुपुत्र व आध्यात्मिक क्रांतीचे जनक स्वामी विवेकानंद तसेच स्वराज्य संकल्पनेच्या पहिल्या शिल्पकार राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या ४२८व्या जयंतीनिमित्त सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथे विविध उपक्रमांचे आयोजन करून हा गौरवपूर्ण दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयात राष्ट्रीय युवक सप्ताह अंतर्गत स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या अध्यक्षा अनिता दिलीपकुमार इंगवले, विश्वस्त चि. विश्वजित दिलीपकुमार इंगवले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात डी. फार्मसी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. भारती मोटे हिने आपले मनोगत व्यक्त केले. ती म्हणाली की, स्वामी



विवेकानंद हे महान भारतीय संत, योगी व समाजसुधारक होते. त्यांचा जन्मदिवस आपण दरवर्षी राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करतो. हा दिवस तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी असून स्वामी विवेकानंदांनी मांडलेले विचार आजही तरुणांसाठी मार्गदर्शनाचा दीपस्तंभ आहेत. त्यांनी तरुणांना शक्ती, स्वावलंबन व समाजाप्रती जबाबदारीचा संदेश दिला असून राष्ट्रीय युवा दिनाचा मुख्य उद्देश तरुणांना प्रेरणा देऊन त्यांच्या जीवनाच्या ध्येयांची जाणीव करून देणे हा आहे, असेही तिने नमूद केले.

मनोगतात पुढे बोलताना तिने सांगितले की, राजमाता जिजाऊ यांनी बालवयापासूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात धर्म, स्वराज्य, न्याय व जनतेप्रती कर्तव्यभावना रुजवली. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा, पराक्रमाची शिकवण व मातृभूमीप्रती निष्ठा या मूल्यांचा पाया जिजाऊंनी घातला. त्यांच्या संस्कारातूनच शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण विकसित झाले. युद्धकौशल्याइतकेच नीतिमूल्ये, प्रजेचा सन्मान व स्त्रियांचा आदर यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे राजमाता जिजाऊ यांचे कार्य आजच्या पिढीसाठीही तितकेच प्रेरणादायी आहे, असे मत तिने व्यक्त केले.

यानंतर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. एनएसएसचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच उपस्थित सर्व विद्यार्थी, पालक, नागरिक व कर्मचारी यांनी संपूर्ण कॉलेज परिसराची स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला.

या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. एस. पी. जोकार, प्रा. ए. व्ही. सपाटे, सांस्कृतिक विभागाचे डॉ. एन. ए. तांबोळी यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुला मुलींनो समाजात आई-वडिलांची किंमत ठेवा...

आजकालची मुले मुली पार बिघडून गेली आहेत. सार्वजनिक ठिकाणी आपल्या वाईट वर्तनाचे ओंगळवाणे प्रदर्शन करून आई-वडिलांच्या नावाला कलंक लावत आहेत. ज्या आई-वडिलांनी आपल्याला जन्माला घालून लहानाचे मोठे केले, नंतर शाळेत शिकायला पाठवून उच्च शिक्षण शिकवले. पण तुम्ही जर आई-वडील शिकवत असलेल्या उच्च शिक्षणाचा वापर आई वडिलांचे नाव रोशन करण्याऐवजी प्रेमाचा व व्यसनाचा बाजार मांडण्यासाठी करत असाल तर तुमच्या एवढा नीच माणूस पृथ्वीतलावर दुसरा कोणीच नाही. गावातील शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर बहुतांश विद्यार्थी पुढील उच्च शिक्षणासाठी शहरी भागात जातात. आई वडील त्यांना भरमसाठ पैसा ओतून चांगल्या कॉलेजला व चांगल्या शिकवणीला पाठवतात. दर महिन्याला आपल्या मुला मुलींना लागेल तेवढा पैसा शेतात काबाडकष्ट करून व घाम गाळून शिक्षणाच्या नावावर पाठवतात. परंतु आज कालची मुले मुली आई-वडिलांनी पाठवलेला पैसा शिक्षणासाठी कमी पण पार्ट्या करण्यासाठी व दारू व मटन खाण्यासाठी अधिक करतात. बरेच विद्यार्थी शहरी भागात शिक्षणासाठी ठेवल्यास फुल दारू पिऊन एसटी बस स्टँड मध्ये किंवा दारूच्या दुकानापुढे झोपलेले आपण बघितलेच असेल. शाळा व कॉलेज करायचे सोडून कॉफी शॉपला जाणे, पर्यटन स्थळे पाहणे, मित्रांचे बर्थडे साजरे करणे, बारवर जाऊन दारू ढोसणे असे प्रकार आजकालची मुले शहरी भागात शिक्षणाच्या निमित्ताने ठेवल्यावर हमखास करतात. असे प्रकार केवळ मुलेच करत नाहीत तर मुली देखील असे कारणामे करायला मुलांपेक्षा काही कमी नाहीत. ज्या आई-वडिलांनी आपण खूप खूप शिकावे म्हणून आपल्याला चांगल्या व नामांकित कॉलेजला प्रवेश घेऊन दिला. चांगली शिकवणी आपल्याला लावून दिली. पण आपण कॉलेजला व शिकवणीला जाण्याऐवजी टुकार पोरांसोबत दारू पीत व पाट्यार्र खात फिरू लागलो तर आपण आई-वडिलांच्या स्वप्नावर पाणी टाकत आहात, आई-वडिलांचा अपेक्षाभंग करत आहात, व्यसनी बनून रोज दारू पिऊन फिरू लागल्यामुळे व एसटी बस स्टॅन्ड मध्ये व दारूच्या दुकानापुढे दारू पिऊन लोळू लागल्यामुळे आपण आई-वडिलांच्या नावाचा चुराडा करत आहोत म्हणून समजा. आपल्या अशा व्यसनी व टुकार वागण्यामुळे आपण स्वतःच्या हाताने आई-वडिलांची किंमत कमी करत आहोत. मुली सुद्धा शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांकडून दर महिन्याला भरपूर पैसा उकळतात. आणि तो पैसा मित्रांच्या, बॉयफ्रेंडच्या व मैत्रिणीच्या बर्थडेला पार्ट्यावर उधळतात. म्हणजे आताची मुले मुली शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांचे रक्त पीत आहेत. मित्रांनो व मैत्रिणींनो आई वडील आपल्याला शेतात खूप कष्ट करून व घाम गाळून शिक्षणासाठी पैसा पाठवत असतात. त्यासाठी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला दर माही न चुकता पैसा पाठवत असतात. तेव्हा आपण देखील आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून खूप खूप अभ्यास केला पाहिजे. जिद्दीने पेटून उठून अभ्यासाच्या नादी लागले पाहिजे. परंतु शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाच्या विळख्यात अडकून बसले नाही पाहिजे. नाहीतर शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा बाजार मांडून आई-वडिलांच्या माघारीच स्वतःच्या मनाने पळून जाऊन लव मॅरेज केले तर आई-वडिलांच्या नावाची किंमत तुम्ही खराब करत आहात म्हणून समजा. त्यासाठी मुला मुलींनी आई-वडिलांच्या नावाला कलंक लावता कामा नये. समाजात आई-वडिलांची मान खाली जाईल असे वागता कामा नये. आपल्यामुळे आई वडिलांची मान गर्वाने वर जाईल आणि त्यांची छाती अभिमानाने फुगून येईल असे काम करावे. तरच खऱ्या अर्थाने आई-वडिलांच्या मनाला समाधान वाटेल...आणि त्यांचा आनंद गगनात न मावणारा असेल... त्यासाठी जाता जाता समस्त मुला मुलींना विनंती करतो की, आपण आई वडिलांना फसवून आई-वडिलांचे आर्थिक व शारीरिक शोषण करू नका..खूप खूप अभ्यास करून आई-वडिलांचे स्वप्न साकार करा...प्रेमाच्या मायाजालात अडकून स्वतःचे जीवन बरबाद करून घेऊ नका... आई-वडिलांनी पाठवलेला पैसा काटकसरीने वापरून त्याचे काहीतरी चीज करा...आई-वडिलांच्या विचारानुसार निर्णय घेण्याची क्षमता ठेवा.. आई वडिलांच्या माघारी पळून जाऊन लग्न करण्याची चूक करू नका... तरच आई-वडिलांना समाजात किंमत राहील...आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावेल...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी, ता.अहमदपूर, जि.लातूर
मो.7498715661

## बेताल बोल

### खेळ, मेळ नि भेळ

माज मस्ती उद्दामपणा
यातून सुटले नाही कोणी...
एकमेकांना काय बोलावे
सगळे एकाच माळेचे मणी...
आज इथे,उद्या तिथे परवा
अजून असतील कोण कुठे...
कोणाला झोप येत नाही,तर
कोण कोणाला भेटतो पहाटे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**


शिवसेना महायुती
केलंय काम निर्विवाद...
आता जनतेचा आशीर्वाद !
स्वच्छ, सुंदर शहरांचं... वचन शिवसेना महायुतीचं !
सुरक्षित वेगवान प्रवास
मुबलक शुद्ध पाणी
उद्योगांची पायाभरणी, रोजगारनिर्मिती
सुसज्ज रुग्णालये, प्रगत आरोग्यसेवा
प्रशस्त पदपथ, मजबूत रस्ते
सुसज्ज क्रीडांगणे आणि अत्याधुनिक क्रीडा संकुल
माय मराठीला मानाचे पान
लाडक्या बहिणींचे सक्षमीकरण, आरोग्यरक्षण
परिवहन सेवा बळकटीकरण
सामाजिक सांस्कृतिक वारशाचे जतन
ज्येष्ठांना आरोग्यसेवा आणि विरंगुळा केंद्र
प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धन
शिवसेना महायुतीला आशीर्वाद देऊ या... चला, भगवा फडकवू या!
धनुष्यबाणासमोरील बटण दाबून शिवसेनेच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा!
प्रकाशक : श्री संजय मोरे (शिवसेना सचिव)

# कवींनी काळजाला भिडणारे काव्य लेखन करावे - ज्येष्ठ कवी माधव पवार

## दयानंद शिक्षण संस्थेच्या ८५ व्या पारितोषिक वितरण सोहळ्यात मार्गदर्शन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कविता ही केवळ शब्दांची जुळवाजुळव नसून ती कवीच्या अंतःकरणातून उमटली पाहिजे. अशाच कविता रसिकांच्या मनाला आणि काळजाला भिडतात. जीवन आनंदी व समृद्ध जगण्यासाठी कोणतीतरी एक कला आत्मसात करावी, संकटांना घाबरू नये तसेच आई-वडील आणि गुरूंचे ऋण कधीही विसरू नये. काव्य लेखन करताना कवींनी समाजमनाला स्पर्श करणारे, काळजाला भिडणारे लेखन करावे, असे आवाहन ज्येष्ठ कवी माधव पवार यांनी केले.





ते दयानंद शिक्षण संस्थेच्या ८५ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे होते. याप्रसंगी ज्येष्ठ कवी माधव पवार यांनी आपल्या ओघवत्या शैलीत 'सांभाळ लेकीच्या जातीला' ही प्रभावी लावणी तसेच विविध सामाजिक व भावस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्येबरोबरच शील जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. 'मुलींना जपा, कारण मुलीचे अश्रू बापाच्या प्रेतावर पडल्याशिवाय आत्म्याला शांती मिळत नाही,' असे भावनिक विधान करून त्यांनी समाजातील संवेदनशीलतेकडे लक्ष वेधले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विजयकुमार उबाळे यांनी ज्येष्ठ कवी रा. ना. पवार यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेने शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या २६३ विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच साक्षी जिनेंद्र सुराणा (कला व शास्त्र विभाग), कावेरी सिद्राम जोडमोटे (वाणिज्य विभाग), मुग्धा गिरीष मेहता, मधुरा भोसले, स्वरांजली बेल पवार, संस्कृती सुरवसे, आर्शया मुजावर (विधी विभाग) आणि राधा केदार पवार (शिक्षणशास्त्र विभाग) या विद्यार्थिनींना पाहुण्यांच्या हस्ते संस्थेचा मानाचा 'दयानंदश्री' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी यांनी करून दिला, तर वार्षिक अहवालाचे वाचन प्राचार्या डॉ. एस. जे. गायकवाड यांनी केले. यावेळी व्यासपीठावर माजी शिक्षणमंत्री डॉ. लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह रजपूत, राधिका लाहोटी, संस्थेचे सचिव डॉ. महेश चोप्रा, महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूरचे जिल्हा प्रमुख पद्माकर कुलकर्णी यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक व मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रीय युवा दिनी नालसा डॉन योजनेअंतर्गत शिबीर संपन्न

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव पी. पी. पेठकर यांच्या सहकार्याने पंढरपूर तालुका विधी सेवा समिती व पंढरपूर अधिवक्ता संघ, पंढरपूर यांचे संयुक्त विद्यमाने सोमवार दि.12 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता सिंहगड अभियांत्रीकी महाविद्यालय, कोर्टी, (ता. पंढरपूर) येथे राष्ट्रीय युवा दिन निमित्त राष्ट्रीय नालसा डॉन योजनेअंतर्गत (ड्रग अवेअरनेस आणि वेलनेस नेव्हिगेशन - ड्रग-फ्री इंडिया योजना-2025 विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी न्यायाधीश श्रीमती एम. बी. कुलकर्णी, यांनी उपस्थीत विद्यार्थ्यांना व्यसनापासून दुर राहून जिद्द व चिकाटीने आयुष्यामध्ये यश मिळविण्याकरीता प्रयत्न करणेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रथम शिबीराची प्रस्ताविका पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. व्ही. एम. भोसले यांनी केली.

तसेच पंढरपूर अधिवक्ता संघाचे पदाधिकारी गणेश चव्हाण, राजेंद्र पुजारी, अंकुश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक शिबीरावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास सिंहगड अभियांत्रीकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश जे. कारंडे, उपप्राचार्य डॉ. श्री. स्वानंद जी. कुलकर्णी, अधिवक्ता संघाचे पदाधिकारी, विधी स्वंयसेवक, विद्यार्थी व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# थोबडे वाड्यात धार्मिक विधीसाठी लागणाऱ्या साहित्याचे पारंपरिक वाटप

## मानकरी मिलिंद थोबडे यांच्या हस्ते ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यात्रेतील विधींना सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेची परंपरागत सुरुवात शेटे वाड्यात योगदंडाच्या पूजनाने झाली. त्यानंतर ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची उत्सवमूर्ती व पादुका सिद्धेश्वर मंदिरातून विधिवत मिरवणुकीने थोबडे वाड्यात आणण्यात आल्या.



सायंकाळी सात वाजता थोबडे वाड्यात मानकरी संजय थोबडे, मिलिंद थोबडे, रितेश थोबडे, सिद्धेश थोबडे तसेच सौ. सुप्रिया सिद्धेश थोबडे यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. पूजनानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यानंतर ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील विविध धार्मिक विधींसाठी आवश्यक असणाऱ्या पूजासाहित्याचे वाटप मानकरी मिलिंद थोबडे, रितेश थोबडे व सिद्धेश थोबडे यांच्या हस्ते संबंधित मानकऱ्यांना करण्यात आले. ही परंपरा अनेक वर्षांपासून अखंडपणे सुरू असून, यात्रेच्या धार्मिक विधींचे यशस्वी आयोजन व्हावे, हा यामागचा उद्देश असल्याची माहिती मानकरी मिलिंद थोबडे यांनी दिली.

थोबडे वाड्यातील ही परंपरा सोलापूरच्या धार्मिक व सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग असून, ग्रामदैवताविषयीची श्रद्धा, एकोप्याची भावना व परंपरेचे जतन याचे उत्तम उदाहरण असल्याचे मत उपस्थित भाविकांनी व्यक्त केले. या धार्मिक कार्यक्रमामुळे यात्रेच्या उत्सवाला अधिकच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# देशासाठी स्वदेशी, लोकशाहीसाठी मतदान करा!

## सोलापूर विद्यापीठाची प्रेरणादायी संकल्प दौड!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व हुतात्मा दिनानिमित्त सोलापूर शहरात भव्य 'स्वदेशी संकल्प दौड' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी 'स्वदेशीचा स्वीकार – देशाच्या विकासाचा आधार', 'भारतीय वस्तू वापरा, देश मजबूत करा' अशा घोषणा देत स्वदेशी वस्तूंच्या वापराचा संदेश दिला. तसेच 'मतदान हा अधिकारच नव्हे तर कर्तव्य आहे', 'लोकशाही बळकट करूया' अशा घोषणा देत मतदान जनजागृती देखील करण्यात आली.




विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा विभाग, स्त्री शक्ती स्वयंसिध्दा केंद्र, प्रधानमंत्री उच्च शिक्षा अभियान आणि स्वदेशी जागरण मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही दौड सोलापूर शहरातील रंगभवन येथील विद्यापीठ अभ्यास केंद्रापासून सुरू होऊन डफरीन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे हुतात्मा चौक येथे सांगता करण्यात आली. या कार्यक्रमात सोलापूर शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) चे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या रॅलीचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, वित्त व लेखाधिकारी सी. ए. महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, डॉ. अंजना लावंड तसेच स्वदेशी जागरण मंचचे चन्नवीर बंकुर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा तरुण पिढीने अंगीकार करावा, असे सांगितले. स्वदेशी जागरण मंचचे चन्नवीर बंकुर यांनी स्वदेशी चळवळ ही केवळ आर्थिक नव्हे तर राष्ट्रीय स्वाभिमानाची चळवळ असल्याचे मत व्यक्त केले. या स्वदेशी संकल्प दौडमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी व लोकशाही मूल्यांबाबत जागृती निर्माण झाल्याचे चित्र सोलापूर शहरात पाहायला मिळाले.

दौडदरम्यान विद्यार्थ्यांनी 'स्वदेशीचा स्वीकार – देशाच्या विकासाचा आधार', 'भारतीय वस्तू वापरा, देश मजबूत करा' अशा घोषणा देत स्वदेशी वस्तूंच्या वापराचा संदेश दिला. तसेच लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मोठ्या प्रमाणात मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी विद्यार्थ्यांनी केले.

यावेळी शपथ देखील घेण्यात आली.

# फडणवीस-कोठे नेतृत्वावर ठेवलेला विश्वास सार्थ ठरला

## प्रभाग २२ चा विकास आता थांबणार नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली ग्वाही ही प्रभाग क्रमांक २२ मधील नागरिकांसाठी मोठी आश्वासक बाब ठरली आहे. हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर झालेल्या जाहीर सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी रामवाडी, लिमयेवाडी, विजापूर नाका आणि प्राणीसंग्रहालय परिसरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा आणि नागरी सुविधांसाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याचा ठाम शब्द दिला. या घोषणेमुळे प्रभाग २२ मधील विकासाला नवे बळ मिळाले असून, नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करणारे भाजपाचे उमेदवार किसन जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार मानले.



मुख्यमंत्री जे बोलतात ते करून दाखवतात. देवेंद्र फडणवीस आणि देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वावर आम्ही जो विश्वास ठेवला होता, तो आज पूर्णपणे सार्थ ठरला आहे. त्यामुळे आता प्रभाग २२ चा विकास थांबणार नाही, तर वेगाने पुढे जाणार आहे, असे जाधव म्हणाले. रामवाडी व लिमयेवाडी भागातील रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा तसेच विजापूर नाका परिसरातील मूलभूत सुविधांच्या कामांना या निधीमुळे गती मिळणार आहे. विशेषतः रोज पाणीपुरवठ्याची घोषणा ही नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर तोडगा निघणार आहे. महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयाचा स्वतंत्र विकास आराखडा तयार असून, त्यासाठीही आमदार कोठे यांच्या प्रयत्नांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाठबळ दिले आहे. केंद्रात व राज्यात भाजपाची सत्ता असताना, महापालिकेतही भाजपाची सत्ता आल्यास विकासकामे अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. किसन जाधव यांनी सांगितले की, निवडून आल्यानंतर उर्वरित राहिलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण केली जातील आणि प्रभागाच्या शेवटच्या टोकापर्यंत विकास पोहोचवला जाईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या स्पष्ट भूमिकेमुळे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे प्रभाग २२ च्या नागरिकांना आता विकासाबाबत ठाम भरोसा मिळाला आहे. या निधीमुळे परिसराचा चेहरामोहरा बदलणार असून, भाजपाच्या माध्यमातूनच प्रभागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा ठाम विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

# हिरकणी महिला संस्थेच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** येथील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, महिला सबलीकरणच्या कार्यात अग्रेसर असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेंबाची व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात सोमवारी साजरी करण्यात आली.



हिरकणी महिला बहुउद्देशिय संस्थेकडून विविध उपक्रम राबविले जात असतात. महिला चळवळीचे व्यासपिठ असून संस्थेकडून सुरू असलेल्या कायार्मुळे संस्थेचे नाव आता तालुका, जिल्ह्या पुरते राहिलेले नाही तर राज्यात झालेले आहे.

सदर संस्थेला श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व आधार स्तंभ अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

दरम्यान संस्थेच्या कार्यात राष्ट्रामाता जिजाऊं माँ साहेंबाच्या व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले, सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, स्वाती निकम, उज्वला भोसले, सुवर्णा घाटगे, संगीता भोसले, छाया पवार, तृप्ती बाबर, कोमल क्षीरसागर, रूपा पवार, कविता भोसले, पल्लवी कदम, श्रद्धा मोरे, विजयालक्ष्मी लोणी, सोनाली लोणी, ज्योती कदम आदीजण महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे समाज सेवाकार्यात उल्लेखनीय योगदान- शिवलिंगेश्वर महास्वामीजी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** शिबिरार्थी व ग्रामस्थांना देशप्रेम, समाजसेवा कर्तव्य आणि जबाबदारी यांची जाणीव करून देण्यात कल्याणशेट्टी महाविद्यालय यशस्वी झाले असून देशभक्ती वृद्धिंगत करण्यात महाविद्यालयाचे उल्लेखनीय योगदान खूप मोठे आहे असे गौरवोद्गार वागदरी येथील विरक्त मठाचे शिवलिंगेश्वर महास्वामीजी यांनी व्यक्त केले.

वागदरी येथे कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केले होते. शिबिर समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर सरपंच शिवानंद घोळसगांव, माजी सरपंच श्रीकांत भैरामडगी, गोगावचे माजी सरपंच प्रदीपजी जगताप, बसवराज शेळके, शरणबसप्पा मंगाणे, कमलाकर सोनकांबळे, प्रदीप पाटील, सुनिल सावंत, श्याम बाबर, असलम मुल्ला, ग्रामपंचायत सदस्य शारदा रोट्टे, जयश्री बटगेरी, कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.



**शिबिरार्थी शाश्वत विकास अभियानात यशस्वी**

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वागदरी गावाचा परिसर स्वच्छ केला, समाजसेवेचा आदर्श घालून दिला, त्यामुळे शाश्वत विकासासाठी युवक हे अभियान यशस्वी झाले आहे असे यावेळी सरपंच शिवानंद घोळसगाव यांनी सांगितले.

पुढे महास्वामीजी म्हणाले की, एनएसएस श्रमसंस्कार शिबिराअंतर्गत स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, ग्राम स्वच्छता, महिला संघटन आदी समाज प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात आले, त्यामुळे मी नाही तर आम्ही या ब्रीदवाक्याची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत साकारली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, प्रणाली थोरात व पंचप्पा जाधव यांनी मनोगत व्यक्त केले तर सूत्रसंचलन समर्थ पवार व बापूजी चव्हाण यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी प्रा शितल झिंगाडे-भस्मे यांनी मानले.

# भाजपच्या आश्वासनांवर प्रणिती शिंदेंचा हल्ला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** काँग्रेसप्रणीत महाविकास आघाडीच्या बाजूने स्पष्ट बहुमताची लाट उसळताना दिसत असून, या संपूर्ण राजकीय घडामोडींच्या केंद्रस्थानी खासदार प्रणिती शिंदे आहेत. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या खोट्या घोषणा, सत्तेची चटक आणि त्यातून आलेला माज जनतेसमोर उघडपणे फाडून काढत भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे.



निवडणुकीच्या तोंडावर भाजपकडून मोठमोठ्या घोषणांचा पाऊस पडत असला तरी प्रत्यक्षात वास्तव मात्र कोरडेच असल्याचा आरोप खा. शिंदे यांनी केला. गेल्या अनेक वर्षांत भाजपने सोलापूरकरांना केवळ स्वप्नं दाखवली असून पाणीपुरवठा, रोजगार, वाहतूक, आरोग्य आणि उद्योग यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर ठोस काम झालेले नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले. अपयश झाकण्यासाठी केवळ आश्वासनांची झड लावली जात असल्याची टीकाही त्यांनी केली. विमानसेवा, आयटी पार्क, वस्त्रोद्योग आणि महामार्ग यांसारख्या घोषणांची पोलखोल करताना त्यांनी भाजपची दिशाहीनता अधोरेखित केली. सोलापूर विमानतळावर नाईट लँडिंग शक्य नसल्याचे तांत्रिक वास्तव माहीत असतानाही प्रचारासाठी अशक्य आश्वासनं दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. आयटी पार्कबाबत फलकांपलीकडे काहीच अस्तित्व नसल्याचा आरोप करत, सोलापूरचा तरुण आजही रोजगारासाठी पुणे व बेंगळुरूकडे स्थलांतर करत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी मतदारांना आवाहन करताना सांगितले की, केवळ आश्वासन देणाऱ्यांना नव्हे तर प्रत्यक्ष काम करणाऱ्यांना संधी द्यावी. सोलापूर महानगरपालिका निवडणूक ही भाजपच्या अपयशावर शिक्कामोर्तब करणारी आणि काँग्रेसच्या पुनरागमनाची नांदी ठरणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# प्रभाग २३ अ मध्ये पोलके सर प्रचारात आघाडीवर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** प्रभाग क्रमांक २३ अ मधील शिवसेना (शिंदे गट) चे उमेदवार मदनलाल पोलके सर यांनी प्रचारात आघाडी घेतली असून, विश्वासू मित्रपरिवार आणि दांडगा जनसंपर्क यांच्या बळावर आपला विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

गेल्या पंधरा वर्षांपासून सैफुल परिसर, माशाळ वस्ती, पापाराम नगर, यामिनी नगर, आदित्य नगर, राजस्व नगर, आरटीओ परिसर तसेच विजापूर रोड परिसरात सामाजिक कार्याच्या माध्यमातून पोलके सरांनी नागरिकांशी घट्ट नाते निर्माण केले आहे. सातत्याने लोकांच्या अडचणींना धावून जाणारे आणि नेहमी उपलब्ध असणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.



'केवळ काम करणारे आणि कामासाठी सदैव तत्पर असणारे मदनलाल पोलके सर यांनाच मतदान करणार आणि त्यांना प्रचंड बहुमताने निवडून आणणार,' असा ठाम निर्धार या परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. प्रभाग २३ मधील विजापूर रोड परिसरात सुशिक्षित आणि सर्वधर्मीय संमिश्र लोकवस्ती असून, सुज्ञ व जाणकार लोकसेवकाची गरज असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे. कोरोना काळात लसीकरण, कीट वाटप, रक्तदान शिबिरे आदी उपक्रमांच्या माध्यमातून अडचणीच्या वेळी नागरिकांच्या पाठीशी उभे राहिलेली माणसेच आपल्या विजयाची शिल्पकार ठरतील, असा विश्वास मदनलाल पोलके सर यांनी यावेळी व्यक्त केला.

# छत्रपती ब्रिगेडच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांची 428 वी जयंती छत्रपती ब्रिगेडच्या वतीने जुळे सोलापूर भागातील छत्रपती ब्रिगेडच्या संपर्क कार्यालयामध्ये जिजाऊंच्या प्रतिमेस महिलांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली.

जगातील अत्युच्च मातृत्व म्हणजे राष्ट्रमाता जिजाऊ होय राजमाता जिजाऊ यांनी महाराष्ट्राला दोन छत्रपती घडवून स्वराज्याची संकल्पना सर्वप्रथम मांडली राष्ट्रमाता जिजाऊ ह्याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या खऱ्या गुरु होत्या असे प्रतिपादन यावेळी शाम कदम यांनी व्यक्त केले. यावेळी छत्रपती ब्रिगेडचे संस्थापक श्याम कदम जिल्हाध्यक्ष अरविंद शेळके महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मोनाली धुमाळ जिल्हा कार्याध्यक्ष मनिषा कोळी प्रियंका शेळके राजनंदिनी धुमाळ आरपीआयचे जिल्हाध्यक्ष धर्मा माने प्रवीण लकशेट्टी महेश तेल्लूर देविदास शिवसिंगवाले धर्मा होनमाने आधी उपस्थित होते.

# प्रशासन व मंदिर समिती यांनी परस्पर समन्वयातून भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात - जिल्हाधिकारी आशीर्वाद

## मंदिर परिसर व होम मैदान सीसीटीव्हीसह आरोग्य पथके सुसज्ज ठेवावीत

## विविध स्टॉल, व्यासपीठ तसेच मनोरंजनासाठी आलेल्या विविध साधनसामग्रीचे फिटनेस सर्टिफिकेट शासकीय यंत्रणेकडून उपलब्ध करून घ्यावे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात दिनांक 12 ते 16 जानेवारी 2026 या कालावधीत श्री सिद्धेश्वर महायात्रा होत आहे, यानिमित्त श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. त्या अनुषंगाने प्रशासन, सोलापूर महानगरपालिका व श्री सिद्धेश्वर मंदिर समिती यांनी परस्पर समन्वयातून भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व ही महायात्रा यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा 2026 च्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, श्रीमती विना पवार, सोलापूर शहर पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, महायात्रा इन्सीडेंट कमांडर तथा शहर अभियंता श्रीमती सारिका आकुलवार, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, सार्वजनिक



बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख तसेच पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, सोलापूर महानगरपालिका व मंदिर समितीने यात्रा कालावधीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मंदिर परिसर तसेच होम मैदान संपूर्ण सीसीटीव्ही च्या नियंत्रणाखाली असले पाहिजे यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कॅमेरे बसवून घ्यावेत. पोलीस विभागाने संपूर्ण यात्रा कालावधीत संपूर्ण सोलापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील या दृष्टीने पोलीस बंदोबस्त ठेवावा तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक नियंत्रण बिनचूक होऊन भाविकांना कोणत्याही त्रास होणार नाही यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

मंदिर परिसर, होम मैदान या ठिकाणी जे विविध प्रकारचे स्टॉल लागणार आहेत तसेच मनोरंजनाचे साहित्य उभारले जाणार आहेत त्या सर्वांची तपासणी तसेच फिटनेस सर्टिफिकेट शासकीय यंत्रणेकडून घेण्याची कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेने करावी. तसेच प्रत्येक स्टॉलला देण्यात येणारे वीज जोडणी याचीही तपासणी विद्युत निरीक्षक यांच्याकडून करून घ्यावी. अग्निशामन दलाने अग्नी प्रतिबंध साहित्य मंदिर व होम मैदान परिसरात ठेवावे तसेच होम मैदानावरील स्टॉल धारकांना याबाबतचे प्रशिक्षण ही द्यावे अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. महापालिका आरोग्य विभागाने मंदिर परिसर व मैदानात आवश्यक त्या ठिकाणी आरोग्य पदके वैद्यकीय उपकरण व औषधासह सुसज्ज ठेवाव्यात. ॲम्बुलन्स तसेच आयसीओ सेंटर ही तयार ठेवावेत. वैद्यकीय दृष्ट्या एखादी इमर्जन्सी आल्यास तात्काळ पोलीस विभागाशी संपर्क साधून त्यादृष्टीने नियोजन आराखडा तयार करावा यासाठी पोलीस विभागाची मदत घ्यावी. तसेच इन्सिडेंट कमांडर यांनी त्यांच्या अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी टू जी सेवा देणारा फीचर फोन खरेदी करावा त्यामुळे संपर्क करण्यास अडथळा येणार नाही. तसेच उप इन्सिडेंट कमांडर म्हणून मंदिर परिसर होम मैदान तसेच प्रदक्षिणा मार्गावर मुख्याधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्याच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा, असेही निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

अन्न व औषध प्रशासनाने त्यांनी तयार केलेल्या ९ पथकाच्या माध्यमातून यात्रा कालावधीत होम मैदान तसेच शहराच्या विविध परिसरात लावण्यात आलेल्या फुल स्टॉलची तपासणी करावी. भेसळ करणाऱ्या वर त्वरित कठोर कारवाई करावी असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडील तीन बोटी मंदिर समितीकडे साहित्य व मनुष्यबळासह उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे मंदिर परिसरातील तलावात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

या प्रकारे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदे अंतर्गत यात्रा कालावधीत करावयाच्या विविध उपाय योजनांचा आढावा सोलापूर महानगरपालिका तसेच पंच कमिटी कडून घेतला तसेच आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

प्रारंभी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे तसेच इन्सिडेंट कमांडर श्रीमती आकुलवार यांनी यात्रा यशस्वी करण्यासाठी महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच पंच कमिटीचे सदस्य यांनी मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी देण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली.

# अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेला प्रारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर -अकलूज येथे दिनांक १२ ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या ४७ व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेला प्रारंभ झाला.



**अशी आहेत स्पर्धेसाठीची बक्षिसे..**

त्रिमुर्ती केसरी कुस्ती स्पर्धेसाठी खुल्या गटाकरिता प्रथम क्रमांकाचे बक्षिस त्रिमूर्ती केसरी चषक व दोन लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दिड लाख रुपये, तृतिय क्रमांकासाठी एक लाख रुपये व चतुर्थ क्रमांकासाठी पन्नास हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आले आहे. तर वजनी गटानुसार विजेत्या व पराजित मल्लांनाही भव्य बक्षीस आहेत.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या स्पर्धेचे उद्घाटन समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नूतन नगरसेवक व स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांचे हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, संचालक रामचंद्र ठवरे, गोविंद पवार, विराज निंबाळकर, दत्ता मगर, वसंतराव जाधव,पोपट भोसले पाटील, बिभीषण जाधव, अनिल काटे यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेचा प्रारंभ उपस्थितांच्या हस्ते ओम शिंदे नातेपुते विरुद्ध युवराज माने खुडूस व सौरभ मिश्किल बेंबळे व स्वप्नील भोसले टेंभुर्णी या मल्लांची स्पर्धा लावून झाला. यामध्ये शिंदे व मिश्किल विजेते झाले. राम सारंग व त्यांचे पंच स्पर्धेसाठी कार्यरत आहेत.

यावेळी अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील म्हणाले, सहकार महर्षींनी सुरू केलेल्या या कुस्ती स्पर्धेला ४७ वर्षे झाली असून या मातीतून अनेक महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खळाडू तयार झाले आहेत. देशपातळीवर लौकिक असणारे हे मैदान आहे.

अखिल भारतीय त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धेसाठी ८०, तर वजनी २५ ते ८५ पर्यंतच्या गटा करीता ६०३ मल्लांनी सहभाग घेतला आहे.स्वागत वसंतराव जाधव यांनी केले. सूत्रसंचालन युवराज केचे यांनी केले.

# गुरुदेव स्वामींना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

**भोसे (काटुसत्य) :-** श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळ, हुनूर संचलित माध्यमिक आश्रम शाळा, हुनूर येथील कर्तव्यदक्ष व कार्यतत्पर मुख्याध्यापक गुरुदेव काशिनाथ स्वामी यांना यावर्षीचा सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, बाळेझसोलापूर यांचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



मुख्याध्यापक गुरुदेव स्वामी यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने भरीव प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत त्यांनी विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम राबवले. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी यासाठी शाळेतील शैक्षणिक वातावरण सक्षम करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सतत प्रेरणा देत संघभावना, शिस्त व कर्तव्यनिष्ठा जोपासण्याचे कार्य त्यांनी केले. सामाजिक व शैक्षणिक जबाबदारीचे भान ठेवून त्यांनी शाळेला दिशा दिल्यामुळे शाळेची शैक्षणिक प्रगती लक्षणीयरीत्या वाढली असून शाळेच्या लौकिकातही भर पडली आहे.

या पुरस्काराच्या घोषणेमुळे श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध स्तरांतून गुरुदेव काशिनाथ स्वामी यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक तसेच मंगळवेढा काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांनीही गुरुदेव स्वामी यांचे अभिनंदन करून त्यांच्या कायार्चे कौतुक केले असून हा पुरस्कार शाळा व संस्थेसाठी गौरवास्पद असल्याचे नमूद केले आहे.

# अकलूज नगरपरिषदेचा पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

## शिवतेजसिंह मोहिते पाटील बिनविरोध उपनगराध्यक्षपदी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज नगरपरिषदेचा पहिलाच पदग्रहण सोहळा, मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात, अकलूज नगरपरिषदेच्या सभाकामकाज सभागृहात पार पडला. यावेळी सर्व नूतन नगरसेवक उपस्थित होते.



माळशिरस तालुक्यातील अकलूज नगरपरिषदेची पहिलीच निवडणूक, नुकतीच आरोप प्रत्यारोच्या चक्री वादळात पार पडली. प्रसंगी निवडणुकीच्या रणांगणात, एका बाजूला सत्ताधीश कमळ डोलत होते तर एका बाजूला तुतारीच्या सुमधुर आवाजात केलेली विकास कामे बोलत होते, म्हणूनच अकलूजच्या जनतेने मोहिते पाटील यांच्या बाजूने मोठा कौल देत सत्ताधारी भाजपला धक्का दिला होता.

अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीत,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या रेश्मा लालासाहेब अडगळे यांनी 12329 मते मिळवत, भाजप उमेदवार पूजा कोतमिरे यांचा पराभव केला होता. चुरशीच्या लढतीत भाजपने 4 जागा जिंकल्या तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने नगराध्यक्षासह 22 जागा जिंकत अकलूज नगरपरिषदेवर झेंडा फडकवला.यामध्ये शिवसेना ठाकरे पक्षाच्या 2 उमेदवारांचा समावेश आहे.

अकलूज नगरपरिषदेसाठी भाजप,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार,या तीन पक्षामध्ये मुख्य लढत होती. 2 डिसेंबर रोजी 34 हजार 408 मतदरापैकी 23 हजार 817 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.12 हजार 161पुरुष व 11हजार 650 महिला मतदारांनी 13 प्रभागातील 39 बुथवर 69.22 टक्के मतदान केले होते.

प्रथमता नूतन नगराध्यक्षा रेश्मा लालासाहेब अडगळे यांनी पदभार स्वीकारला. यावेळी अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी, त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नूतन नगरसेवक शिवतेसिंह उदयसिंह मोहिते पाटील यांचा उपनगराध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज आल्याने, त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे नगराध्यक्ष रेश्मा लालासाहेब अडगळे यांनी घोषित करून त्यांचा सत्कार केला.

यावेळी स्वीकृत नगरसेवक म्हणून मिलिंद कोतमीरे, योगेश गांधी,आजरुद्दीन शेख यांची निवड करण्यात आली. यावेळी सभागृहाने टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले तर नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, शितलदेवी मोहिते पाटील, संग्रामसिंह मोहिते पाटील , किशोरसिंह माने पाटील यांनी अकलूज नगरपरिषद येथे उपस्थित रहात नवनिर्वाचित नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष तसेच सर्व नगरसेवक यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी मार्गदर्शन करीत त्यांना पुढील कायार्साठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अकलूज नगरपरिषदेच्या प्रांगणात कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती तर फटाक्यांची आतिषबाजी करत कार्यकर्त्यांनी आनंद उत्सव साजरा केला.

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# वाखरी गटात काळेंचा संक्रांतीनिमित्त हजारों महिलांचा स्नेहमेळावा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त वाडीकुरोली येथे राष्ट्रवादीचे प्रांतिक सदस्य परिवाराचे कुटुंबप्रमुख कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हुरडा पार्टी, महिला स्नेहमेळावा तसेच ह्यसन्मान नारी शक्तीचाह्न हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला वाखरी गटातील हजारो महिला माता-भगिनींची अभूतपूर्व उपस्थिती लाभली.

सहकार शिरोमणी वसंतदादांचा सामाजिक वारसा अखंडपणे पुढे नेत असताना सार्वजनिक व राजकीय कार्यक्रमांमध्ये पुरुषांची संख्या अधिक असते. मात्र, घर, संसार, कुटुंब व विविध जबाबदाऱ्यांमध्ये गुंतलेल्या माता-भगिनींनाही स्वतःसाठी काही क्षण आनंदाचे, मनमोकळेपणाचे व एकमेकांशी संवाद साधण्याचे मिळावेत, या आपुलकीच्या भावनेतून या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे चार तास महिलांनी दैनंदिन ताणतणाव विसरून हुरड्याचा आस्वाद घेत मनमुराद आनंद लुटला.

यावेळी उपस्थित महिलांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, हा कार्यक्रम केवळ हुरड्यापुरता मर्यादित नव्हता, तर आपुलकी, सन्मान, विश्वास व नात्यांचा जिव्हाळा




देणारा हा अनुभव आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला आहे.

कार्यक्रमात श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका सौ. संगीताताई काळे, सौ. जयश्रीताई काळे तसेच जिल्हा परिषद वाखरी गटातून निवडणूक लढवणार असलेल्या मोनिकाताई काळे यांनी उपस्थित महिलांचे मनःपूर्वक स्वागत केले. काळे परिवारातील कुटुंबप्रमुख आईसाहेब मालनकाकू काळे व सुमनकाकू काळे यांची उपस्थिती कार्यक्रमाला विशेष भावनिक उंची देणारी ठरली. या प्रसंगी महिलांनी एकमुखाने, 'काळे कुटुंब आमचा विश्वास आणि आमचा परिवार आहे. आम्ही कायम काळे कुटुंबासोबत आहोत,' असा ठाम निर्धार व्यक्त करत मोनिकाताई काळेंना आपला जाहीर पाठिंबा दिला. त्यामुळे वाखरी गटात मोनिकाताई काळेंना महिला शक्तीचा भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्ट झाले.

महिलांच्या सन्मान, संस्कृती व सक्षमीकरणाचा जागर करणारा आनंददायी सांस्कृतिक कार्यक्रम राहुल नवनाथ राजे यांनी प्रभावीपणे सादर केला. यावेळी बोलताना सौ. संगीताताई काळे म्हणाल्या की, सामाजिक कार्य करताना आपल्या माणसांची साथ, प्रोत्साहन व भक्कम आधार अत्यंत महत्त्वाचा असतो. आज माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद वाढवला असून हीच साथ सदैव कायम राहावी, असे आवाहन त्यांनी केले. मोनिकाताई काळे यांनी उपस्थित सर्व माता-भगिनींचे आभार मानत सांगितले की, सहकार शिरोमणी वसंतदादांची सून म्हणून तुमचा आशीर्वाद घेण्यासाठी मी तुमच्यासमोर येणार असून दादांचा वसा व वारसा प्रामाणिकपणे पुढे चालू ठेवण्याचा निर्धार केला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांमधील विजेत्या महिलांना आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच मकर संक्रांतीनिमित्त काळे परिवाराच्या वतीने उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **BABASO DADARAO SADIGALE** to **BABASAHEB DADARAO SADIGALE** for passport issuance.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **SHUBHAM BABASO SADIGALE** to **SHUBHAM BABASAHEB SADIGALE** for passport issuance.

**जाहीर प्रसिध्दीकरण** क्र/अभिलेख/कावि/ ५१३ /२०२५

**मोहोळ येथील मा.तहसिलदार सो,यांचे कोर्टात**

अब्दुल सत्तार अमीर साहीब शेख, वय ७४ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त, रा. वालचंद कॉलेजच्या पाठीमागे, ६४१ बी. कर्णीक नगर, सोलापूर, जि. सोलापूर- ४१३००६- } **अर्जदार**

**विरुध्द**


१.मा. तहसिलदार साहेब ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. तहसिलदार साहेब, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.
२.ग्रामपंचायत सावळेश्वर, ता. मोहोळ, जि.सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक सावळेश्वर, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार अब्दुल सत्तार अमीर साहीब शेख यांचा जन्म ता.२०/०१/१९५१ रोजी मौजे सावळेश्वर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे अर्जदार हिची आई रहिमतबी अमीर साहीब शेख हिचे पोटी माहेर घरी झाला आहे. अर्जदार यांनी सामनेवाला नं.२ यांच्याकडे अर्जदाराच्या जन्माची दाखल्याची मागणी केली असता, सामनेवाला नं.२ यांनी सदर कालावधील जन्म मृत्यु रजिष्टर उपलब्ध नसल्याने सदरचा दाखला सामनेवाला नं. १ यांचे कार्यालयातुन घ्यावे असे तोंडी सांगितले. त्यानंतर अर्जदार याने सदर सामनेवाला नं.१ यांचेकडे अर्जदार यांच्या जन्माची दाखल्याची ता. ११/१२/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता, सामनेवाला नं. १ यांनी माहे जानेवारी १९५१ सालचे रजिष्टर तपासले परंतू त्यामध्ये अर्जदाराचे जन्माची नोंद नसल्याबाबतचा क्र. २०२५/अभिलेख/कावि/११८४ दि.११/१२/२०२५ रोजी दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. / /२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासून १५ दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.५/१/२०२५

हुकूमावरुन

**लिपीक** (शिक्का) **१. तहसिलदार सो मोहोळ**

## कटूसत्य शब्दकोडे



**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय
३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य
५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे
७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो ***
१०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त
१७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव
२२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत)
२५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे
३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ
४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन
४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी
४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री
४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ
५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा
५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

## सुडोकु - 150

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | 4 | | 8 | | |
| | | 3 | | | 1 | | 5 | |
| 8 | | 1 | 7 | | 6 | 3 | 4 | 9 |
| | | 5 | | | 9 | 1 | | 2 |
| 2 | 1 | | | | 8 | | 6 | 4 |
| | | | | 6 | | 5 | | |
| 5 | 6 | | 9 | 1 | 3 | 4 | | |
| | 4 | 2 | 6 | | | | 1 | |
| 1 | | 7 | | | | 6 | | 3 |

# प्रभाग ६ मध्ये महालक्ष्मी महिला पापड गृह उद्योगाचा शिवसेनेला खुला पाठिंबा

## मनोज शेजवाल यांचे सातत्यपूर्ण विकासकाम अनुकरणीय



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ६ मध्ये शिवसेना-शिंदे गटाच्या सर्व उमेदवारांना महालक्ष्मी महिला पापड गृह उद्योग व थोबाडे मळा येथील रहिवाश्यांकडून खुला पाठिंबा मिळाला आहे.

प्रभागातील एक नागरिक यांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोज भाईजी शेजवाल यांनी या भागातील लोकांसाठी सातत्यपूर्ण कामगिरी करत बोगद्याचा प्रश्न यशस्वीरीत्या सोडवला आहे. 2007 पासून सुरू झालेला मोर्च आणि 2014 पर्यंत सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे आज बोगदा पयार्यी मार्ग म्हणून वापरण्यास तयार झाला आहे.

या प्रभागातील रहिवाश्यांनी सांगितले की, "मनोज भाईजींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच बोगद्याचे काम पूर्ण झाले आणि आमच्या सोसायटीतून येणाऱ्या मागार्चा प्रश्न सुटला. आज आम्ही हा आभाराचा संदेश पोस्टच्या माध्यमातून देत आहोत. चारही उमेदवार निवडून देण्याचा आमचा निर्धार आहे."

शिवसैनिक आणि रहिवाश्यांनी मनोज भाईजी शेजवाल यांचे काम कामाची पोच पावती म्हणून मानले असून, त्यांच्या सातत्यपूर्ण सेवेला आदर व्यक्त केला आहे.

शिवसेना-शिंदे गटाच्या उमेदवारांसाठी मिळालेला हा खुला पाठिंबा महिला सहभाग आणि नागरिकांच्या विकासावर विश्वास दर्शवतो. विशेषतः गरीब घरातील महिलांनाही उमेदवारीसह संधी देण्यात आली असल्याने, प्रभागातील नागरिकांचा विश्वास गटावर दृढ झाला आहे.

यावेळी प्रभागातील नागरिकांनी घोषवाक्याने प्रकट केले की, "जय महाराष्ट्र Bhaiji ! चारही उमेदवार विजयी होतील." या पाठिंब्यामुळे शिवसेना-शिंदे गटाच्या प्रचाराला मोठा चालना मिळाली आहे.

# प्रभाग ६ मधील विरोधकांची दादागिरी मोडीत काढणार : पालकमंत्री गोरे




### उद्योजक राजू डोंगरे यांचा भाजपच्या पॅनलला पाठिंबा !

पापड उद्योगाच्या माध्यमातून हजारो महिलांच्या हाताला काम मिळवून देणारे लक्ष्मी पापड उद्योग समूहाचे संस्थापक राजू डोंगरे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग क्रमांक सहा मधील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला पालकमंत्री गोरे यांनी त्यांचे स्वागत केले महिलांच्या हाताला जास्तीत जास्त काम मिळण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न हवेत अशी अपेक्षा राजू डोंगरे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक ६ मधील साठे पाटील वस्तीमध्ये पॅनल प्रमुख गणेश वानकर यांनी सांगितलेल्या समाज मंदिर, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, महिलांसाठीचे सुसज्ज शौचालय आणि नाल्यावरून येण्याजाण्यासाठी पूल बांधण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. समाज मंदिरासाठी ५० लाख निधी देऊ. कामाचे उद्घाटन सुद्धा आपणच करणार आणि काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे लोकार्पणाची फीतसुद्धा आपणच कापणार, अशी ग्वाही देत प्रभाग क्रमांक ६ मध्ये विरोधकांकडून सुरू असलेली दादागिरी मोडीत काढण्याचा इशारा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिला. भारतीय जनता पार्टीचे प्रभाग क्रमांक ६ मधील उमेदवार पॅनल प्रमुख गणेश वानकर, सुनील खटके, सोनाली गायकवाड आणि मृण्मयी गवळी यांच्या प्रचाराच्या निमित्ताने सोमवारी सायंकाळी साठे पाटील वस्तीमध्ये जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या परिसरात नगरसेवक असताना गणेश वानकर यांनी मोठ्या प्रमाणावर कामे केलेलीच आहेत. मात्र आता त्यांनी ज्या काही अडचणी सांगितल्या, त्या अडचणी आपण शंभर टक्के पूर्ण करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. विरोधकांना इशारा देतानाच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्याज बट्टावाल्यांची दादागिरी खपवून घेणार नाही. व्यवसायच काढून घेऊ असा इशारा दिला. केंद्रात राज्यात भाजपाची सत्ता आहे. आता सोलापूर महानगरपालिकेत सुद्धा भारतीय जनता पार्टीची सत्ता येणार असल्यामुळे प्रभाग क्रमांक ६ मधील विकासाला निधी कमी पडू देणार नाही. विरोधक येतील मते मागतील, पण नेमके आपण काय काम केले, हे मात्र ते सांगू शकणार नाहीत. त्यामुळे शतप्रतिशत भाजप आणि लाडक्या बहिणींच्या जोरावर सोलापूर महानगरपालिकेत आपकी बार ७५ पार भाजप निश्चितच करेल, असा विश्वासही पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

साठे पाटील वस्तीमध्ये एकेकाळी येण्यासाठी रस्ते नव्हते, चांगली ड्रेनेज लाईन नव्हती, पिण्याच्या पाण्याची तर अवस्था अत्यंत बिकट होती. संपूर्ण अंधाराचे साम्राज्य होते. महिलांना शौचालयं उपलब्ध नव्हती. मात्र या भागात आपण ही सर्व कामे १०० टक्के पूर्ण केली असल्यामुळेच जनतेने पुन्हा एकदा आपल्याला महानगरपालिकेत पाठवायचा निर्णय घेतला असल्याचे, भाजपचे पॅनल प्रमुख गणेश वानकर यांनी सांगितले. आमदार विजयकुमार देशमुख यांनी या प्रभागाच्या विकासकामांसाठी कोट्यवधीचा निधी दिला असल्याचे सुनील खटके यांनी सांगितले.

दरम्यान पालकमंत्री गोरे यांनी प्रचाराच्या दरम्यान प्रभाग क्रमांक सहा मधील बल्लारी चाळ येथील नागरिकांशी संवाद साधला आणि अडचणी समजून घेतल्या आणि त्या अडीअडचणी सोडविण्याचा शब्दही त्यांना दिला.

या बैठकीला ज्येष्ठ नेते प्रकाश वानकर यांच्यासह साठे - पाटील वस्ती व थोबडे वस्ती मधील ज्येष्ठ नागरिक अशोक कुंभार, अरुण आवताडे महाराज, किसन पवार, नाना गरड,नारायण बचूटे,उमेश कांबळे,अस्लम पटेल, महादेव गवळी,अजय डिगोळे,आशिष डिगोळे, अरुण जाधव, विजय घुले, सागर डोके, रफिक पटेल, राजू पवार, विठ्ठल मेट्रे,संदीप काशीद, बाळासाहेब गवळी, व परिसरातील महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# स्वराज्याच्या जननी : राजमाता जिजाबाई

## त्याग, संघर्ष आणि राष्ट्रनिर्मितीची प्रेरणादायी गाथा



महाराष्ट्राच्या आणि संपूर्ण भारताच्या इतिहासात राजमाता जिजाबाई यांचे स्थान केवळ एका राजाची माता म्हणून नसून, स्वराज्याच्या जननी आणि राष्ट्रमातेच्या रूपात अढळ आहे. त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे झाला. त्या त्या काळातील अत्यंत बलदंड, पराक्रमी व प्रभावशाली सरदार लखोजी जाधवराव यांच्या कन्या होत्या. जाधव व भोसले ही दोन्ही घराणी निजामशाही दरबारात आपला दबदबा व वचक राखून होती.

सन १६०५ मध्ये जिजाबाई यांचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला. भोसले घराणे हे महाराष्ट्रातील प्रतिष्ठित व शौर्यसंपन्न घराणे होते. मात्र पुढे निजामशाही दरबारातील एका घटनेमुळे भोसले आणि जाधव घराण्यांमध्ये तीव्र वैर निर्माण झाले. खंडागळे नावाच्या सरदाराच्या हत्तीच्या उधळणीतून झालेल्या संघर्षात लोकजीराजांचे पुत्र दत्ताजी राजे आणि शहाजीराजांचे चुलतबंधू संभाजी राजे मारले गेले. हा जिजाबाईंच्या आयुष्यातील पहिला मोठा मानसिक आघात होता.

यानंतर २५ जुलै १६२९ रोजी निजामशहाने भर दरबारात भेटीसाठी बोलावून लखोजी जाधवराव आणि त्यांच्या दोन पुत्रांचा विश्वासघातकी खून केला. हा जिजाबाईंच्या मनावर झालेला दुसरा भीषण आघात होता. या घटनांनी त्यांचे अंतःकरण पूर्णतः हादरले आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ज्वाला त्यांच्या मनात पेटली.

१६३० ते १६३६ हा काळ जिजाबाईंच्या आयुष्यात अत्यंत धावपळीचा व संघर्षाचा ठरला. १६२९ साली जिजाबाई व शहाजीराजे यांच्या पोटी संभाजी राजे यांचा जन्म झाला. पुढे १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारा ठरला.

शहाजीराजांनी निजामशाही पुनर्स्थापनेसाठी मोगल व आदिलशाहीविरोधात संयुक्त मोहिम आखली, मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर रणदुल्ला खान यांच्या माध्यमातून त्यांनी आदिलशाहीची मनसबदारी स्वीकारली. पुढे शहाजीराजे व त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी राजे यांची कारकीर्द मुख्यतः कर्नाटक व दक्षिण भारतात गेली. बंगळूर हे त्यांचे प्रमुख ठिकाण बनले. याच दरम्यान कनकगिरी येथे झालेल्या युद्धात संभाजी राजे वीरमरण पावले. हा जिजाबाईंच्या जीवनातील तिसरा आणि अत्यंत वेदनादायक आघात होता.

या सर्व घटनांमुळे जिजाबाईंचे मन अक्षरशः जळून निघाले होते. देवगिरीच्या यादव राज्याच्या पतनानंतर महाराष्ट्रावर परकीय सत्तांचे अत्याचार वाढत गेले होते. या परिस्थितीवर एकमेव उपाय म्हणजे स्वराज्याची स्थापना, हे जिजाबाईंनी ओळखले. हे कार्य आपल्या पुत्राकडून घडावे, अशी त्यांची तीव्र इच्छा होती. बालवयापासूनच त्यांनी शिवाजी महाराजांच्या मनात स्वराज्य, धर्म, संस्कृती, परकीय आक्रमणाचा प्रतिकार आणि न्याय यांची बीजे रोवली.

मोरे प्रकरण, अफजलखान वध, शाहिस्तेखान्यावरील छापा, आग्रा भेट यांसारख्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मातोश्रींचा सल्ला व आशीर्वाद घेतला होता. जिजाबाई या केवळ माता नव्हत्या, तर त्या महाराजांच्या मार्गदर्शक, प्रेरणादायी गुरू होत्या.

त्याच प्रेरणेच्या बळावर ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या थाटात पार पडला. विजयनगर साम्राज्यानंतर लोप पावलेली हिंदू राज्याभिषेकाची परंपरा जिजाबाईंच्या स्वप्नपूर्तीमुळे पुन्हा एकदा साकार झाली. दुर्दैवाने राज्याभिषेकानंतर अवघ्या ११ दिवसांत, १७ जून १६७४ रोजी राजमाता जिजाबाई यांचे निधन झाले. ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील अपूरणीय हानी होती.

राजमाता जिजाबाईंनी केवळ स्वराज्य घडवले नाही, तर दोन छत्रपती घडवले. त्या आदर्श माता, आदर्श आजी आणि राष्ट्रमाता होत्या. त्यांच्या संस्कारांचे फलित म्हणजे पुढे छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान आणि छत्रपती शाहू महाराजांचा राज्याभिषेक. १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा येथे शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला, हीच जिजाबाईंच्या राष्ट्रनिर्मितीच्या दूरदृष्टीची पावती आहे.

राजमाता जिजाबाई म्हणजे त्याग, धैर्य, दूरदृष्टी आणि राष्ट्रभक्ती यांचा जिवंत आदर्श. त्यांचे जीवन आजही प्रत्येक माता, प्रत्येक नागरिक आणि प्रत्येक शासकासाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरते.

**श्री उदयसिंह उर्फ फत्तेसिंह सुभाषराव देशमुख**
संस्थापक अध्यक्ष
मराठी कालीन इतिहास संशोधन मंडळ, मोहोळ

# प्रभाग १५ क मधून महेश गाडेकरांना वाढता जनसमर्थन

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या घड्याळ चिन्हाला कष्टकरी व सुज्ञ मतदारांचा पाठिंबा



विनोद भोसले व अरिफ शेख यांच्या वरच्या नाराजीचा अँटिवोटरचा फटका त्यांना बसणार आहे सायलेंट किलर मतदार या भागात खूप आहेत त्याचा फायदा मला नक्की होईल. **- गाडेकर**

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ क मधील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ( अजित पवार गट) कडून घड्याळ या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवत असलेले उमेदवार महेश बजरंग गाडेकर यांना दिवसेंदिवस वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. सातत्यपूर्ण सामाजिक कार्य, अभ्यासपूर्ण भूमिका आणि ठाम वैचारिक मांडणीमुळे त्यांचा प्रचार वेग घेत आहे.

माळकरी कुटुंबातून आलेले, निर्व्यसनी व तत्वनिष्ठ सामाजिक कार्यकर्ते म्हणून महेश गाडेकर यांची प्रभागात ओळख आहे. सत्तेसाठी नव्हे तर समाजहितासाठी आणि लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी आपण निवडणूक लढवत असल्याचे ते ठामपणे सांगत आहेत. 'सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता' या प्रवृत्तीला छेद देण्यासाठी सामान्य नागरिकांचा सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय म्हणून आपण निवडणूक रिंगणात उतरलो असल्याचे मत त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केले जात आहे.

प्रभाग १५ मधील विविध सार्वजनिक प्रश्नांवर गाडेकर यांनी यापूर्वीही आक्रमक आणि प्रभावी भूमिका घेतली आहे. सोलापूरच्या सिद्धेश्वर यात्रेदरम्यान निर्माण होणाऱ्या धूळप्रदूषण, स्वच्छता व्यवस्था आणि आपत्कालीन रस्त्यांच्या प्रश्नावर त्यांनी न्यायालयीन लढा दिला होता. तसेच पार्क चौकाचे नामकरण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व भैय्या चौकाचे नामकरण लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक असे करण्यात येऊन त्या ठिकाणी स्वच्छता व सुशोभीकरणाची कामे झाली असल्याची माहिती त्यांच्या कार्यकर्त्यांनी दिली.

कोरोना महामारीच्या काळात बाधित रुग्णांची माहिती जाहीर करण्यासंदर्भात त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याची जागतिक आरोग्य संघटना (हलड) ने दखल घेतल्याचा उल्लेखही प्रचारादरम्यान केला जात आहे. कायद्याचा सखोल अभ्यास, सामाजिक प्रश्नांची जाण आणि कष्टकरी वर्गाबद्दलची संवेदनशीलता ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे मत मतदारांमधून व्यक्त होत आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान महेश गाडेकर हे मतदारांना जात, धर्म व पंथाच्या पलीकडे जाऊन केवळ सामाजिक कार्य, प्रामाणिकपणा आणि कामगिरीच्या आधारे मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. 'खबर पक्की... बदल नक्की... असा विश्वास त्यांनी व्यक्त करत घड्याळ चिन्हाला मतदान करून प्रभागात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन केले आहे.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. प्रभाग १५ क मधील ही लढत अत्यंत चुरशीची ठरण्याची शक्यता असून, मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने झुकतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भाजप चा अजितदादांच्या राष्ट्रवादी ला दे धक्का

## प्रभाग क्रमांक 9 मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार तुषार जक्का यांचा भाजप मध्ये प्रवेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाला अवघे तीन दिवस शिल्लक असताना भाजपने मोठी खेळी खेळली आहे. सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक 9 ड मधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अधिकृत उमेदवार तुषार जक्का यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.तुषार जक्का यांचा भाजपमध्ये प्रवेश पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत पार पडला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या प्रवेशामुळे प्रभाग क्रमांक 9 ड मधील राजकीय गणिते पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रभागात भाजपचे उमेदवार मेघनाथ येमूल, राष्ट्रवादी काँग्रेसचे तुषार जक्का आणि शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुरेश गायकवाड यांच्यात तिरंगी लढत रंगणार होती. मात्र राष्ट्रवादीच्या अधिकृत उमेदवाराने भाजपमध्ये प्रवेश केल्याने ही लढत आता एकतर्फी होण्याची चर्चा सुरू झाली आहे. भाजपने ऐनवेळी राष्ट्रवादीचा उमेदवार आपल्या गोटात घेतल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. तर भाजप समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मतदानापूर्वीच घडलेल्या या घडामोडीमुळे सोलापूरच्या राजकारणात आणखी नाट्यमय वळण लागले आहे।

दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेची रणधुमाळी सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. एकीकडे भाजपमध्ये अंतर्गत बंडखोरीचे सूर स्थानिक आमदारांकडून ऐकू येत आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीत जागावाटपाचा फॉम्युर्ला जाहीर झाल्यानंतर अनेक इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी पसरली आहे.

# सोलापूरच्या विकासासाठी काँग्रेस-महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे सोलापूरकरांना आवाहन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस-महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. सोलापूर दौऱ्यावर आले असताना त्यांनी सत्ताधारी भाजपवर जोरदार टीका करत भाजपचे राजकारण लोकशाहीविरोधी आणि सत्ताकेंद्री झाल्याचा आरोप केला.

सपकाळ म्हणाले की, ह्रभाजप सैराट झाला असून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम सुरू आहे. ह्रपैसा फेका, तमाशा दाखवा आणि निवडणूक जिंकाह्र हेच सध्या भाजपचे धोरण बनले आहे.ह्र महापालिका निवडणूक ही पाणी, रस्ते, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, बागा, सार्वजनिक वाहतूक, पार्किंग यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांवर लढली जाणे अपेक्षित असते. मात्र सत्ताधारी पक्ष विकासावर चर्चा करण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण करत असल्याची टीका त्यांनी केली.

पूर्वीच्या निवडणुकांमध्ये लोकशाही मूल्ये, ग्राम-शहर पातळीवरील प्रश्न आणि लोकाभिमुख निर्णयांना महत्त्व दिले जात होते. काँग्रेसने सत्तेचे विकेंद्रीकरण करून अधिकार थेट जनतेपर्यंत पोहोचवले, असे सांगत सपकाळ यांनी काँग्रेसच्या लोकशाही परंपरेवर भर दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना सपकाळ म्हणाले की, त्यांच्यात प्रचंड अहंकार असून बुलडोझरच्या राजकारणातून सत्ता, पैसा आणि शासकीय यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा परिस्थितीत संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसचा संघर्ष सुरूच राहील, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील सोलापूर, अकोट आणि खोपोली येथे निवडणूक प्रक्रियेदरम्यान झालेल्या खुनांच्या घटनांचा उल्लेख करत त्यांनी चिंता व्यक्त केली. भाजपकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या, भ्रष्टाचार व महिलांवरील अत्याचाराच्या आरोपांतील व्यक्तींना उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप करत, हे राजकारण राज्यासाठी अत्यंत भयावह असल्याचे ते म्हणाले.

सोलापूर स्मार्ट सिटीच्या दाव्यांवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'दुर्बिणीतूनही सोलापूरचा स्मार्टपणा दिसत नाही. प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. मुख्यमंत्री येथे येऊन दरवेळी जुन्याच आश्वासनांची पुनरावृत्ती करतात, म्हणून आम्ही त्यांना 'गजनी' म्हणतो,' अशी घणाघाती टीका त्यांनी केली. पाणीटंचाई, खराब रस्ते, कामगार कल्याण योजना, उद्योगवाढ तसेच बोरामणी विमानतळ यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर गेल्या दहा वर्षांत कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

'लाडकी बहीण' योजनेबाबत बोलताना सपकाळ म्हणाले की, काँग्रेस या योजनेच्या विरोधात नाही. मात्र निवडणुकीआधी अनेक महिने पैसे रोखून धरून मतदानाच्या अगदी तोंडावर रक्कम देणे हा आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. उलट काँग्रेस या योजनेची रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याची मागणी करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सोलापूर हे कष्टकरी कामगारांचे शहर असून 'विविधतेत एकता' हीच त्याची खरी ओळख आहे. त्यामुळे ध्रुवीकरणाच्या राजकारणाला नकार देत शहराच्या विकासासाठी काँग्रेस व महाविकास आघाडीला साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

ही पत्रकार परिषद हॉटेल बालाजी सरोवर येथे पार पडली. त्यानंतर सपकाळ यांनी काँग्रेस-महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक १६ व २०/२१ मध्ये आयोजित पदयात्रेत सहभाग घेतला.

प्रभाग १६ मधील उमेदवार नरसिंह आसादे, बिलकिसबानो दफेदार, सीमा यलगुलवार, नरसिंग कोळी तसेच प्रभाग २१ मधील उमेदवार अनुराधा काटकर, नुसरत शेख, सिद्धार्थ रणधिरे, अझरुद्दीन शेख यांच्या प्रचारासाठी ही पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत हजारो नागरिक व मतदार सहभागी झाले होते.

यानंतर ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त सपकाळ यांनी श्री सिद्धेश्वर मंदिरात दर्शन घेतले. पंचकमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, काँग्रेस प्रवक्ते अशोक निंबर्गी, माजी नगरसेवक मनोज यलगुलवार, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, माजी अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, उदय चाकोते, अ‍ॅड. केशव इंगळे, तिरुपती परकीपंडला, राहुल वर्धा, सुरेश हावळे, पशुपति माशाळ, शकील मौलवी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी स्वराज्याची प्रेरणा दिली - सिईओ जंगम

## जिल्हा परिषदेमध्ये जिजाऊ व सावित्रीच्या लेकींचा सन्मान




### आईचा त्याग खुप मोठा - सिईओ कुलदीप जंगम

राजमाता जिजाऊ यांनी शिवरायांचे मनात स्वराज्याची प्रेरणा दिली. हीच प्रेरणा देशात गेली. यामध्ये राजमाता जिजाऊंचे योगदान खुप मोठे आहे. आई म्हणजे त्याग, न्याय, शिस्त व संस्कार यांची मुर्ती आहे. तेच संस्कार जिजाऊंनी शिवरायांवर केले.माझे जीवनात आईचा खुप मोठा प्रभाव आहे. आई घराला शिस्त लावते त्या बरोबर पतीला पण शिस्त लावते. माझे आई शिक्षक आहेत. रिटायर ला दोन वर्षे आहेत परंतू ते ज्ञानदीनाचे काम करतात. आई व वडिल यांचे संस्कारामुळे मी आयएएस, भाऊ व बहिण इंजिनियर व डॉक्टर आहेत. आई न्यायाचे प्रतिक आहे. आईला पर्याय त्याग हा शब्द आहे. असेही सिईओ कुलदीप जंगम यांनी सांगितले.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी स्वराज्याची प्रेरणा दिली असे मत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

जिल्हा परिषदेत आज मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखेच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती निमित्त जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात राष्ट्रवादी जिजाऊ यांचे जयंतीचे आयोजन करणेत आले होते. या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे शुभहस्ते राजमाता जिजाऊ यांचे प्रतिमेचे पूजन करणेत आले. या प्रसंगी जिजाऊ व सावित्रीच्या लेकींचा सन्मान मान्यवरांचे हस्ते करणेत आला.

या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) श्रीमती स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्रीमती मिनाक्षी वाकडे, शिक्षणाधिकारी कादर शेख, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, संतोष कुलकर्णी, एच. सी सपताळे गटविकास अधिकारी मनोज राऊत,विवेक जमदाडे, रघुनाथ पांढरे, उमेश कुलकर्णी,जस्मीन शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सचिन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष उपस्थिती होती. जिल्हा परिषदेत खाते प्रमुख व गट विकास अधिकारी यांच्या आईचा कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान करण्यांत आला. यावेळी जिल्हा परिषदेतील सर्व जिजाऊ, सावित्रीलेकींचा मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. होते. प्रारंभी जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून अभिवादन करण्यात आले. जिजाऊ वंदना अश्विनी भोसले यांनी तर राज्यगीत मोहंमद अयाज यांनी गायले. यावेळी मालती नंदकुमार कोहिणकर, उषा उत्तमराव जगताप, छाया महादेव पाटील, वनमाला महादेव भुजबळ, माया चंद्रहार जाधव, मंगला यशवंत मिरकले, कल्पना तानाजी वाकडे, सुदामती नागनाथ जगताप, प्रभावती गोविंद नवले, नंदाबाई शिवाजी हावळे, कलावती भरत धनशेट्टी, बायडाबाई सुभाष कवितके, सविता तानाजी कदम, वनिता विजय जमदाडे,चंद्रभागा भगवान पांढरे, कुसूम जनार्दन कुलकर्णी,लियाकत नैनुद्दीन शेख, सुनिता बापूराव राऊत यांचा सन्मान करण्यात आला.

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सभागृहात दिवसभर रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते त्यात..66..एवढ्या रक्तदात्यांनी उत्साहाने रक्तदान केले.

कार्यकमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाच्या जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी केले.

यावेळी शिक्षक संघटनेचे नेते अनिरुद्ध पवार,निलेश देशमुख,राम शिंदे,सुनिल चव्हाण, शामराव पाटील व कर्मचारी संघटनेचे नेते अरूण क्षीरसागर, राजेश देशपांडे, दिनेश बनसोडे, संतोष जाधव यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन साळुंखे, सुर्यकांत मोहिते, सचिन चव्हाण, चेतन भोसले, आनंद साठे, विकास भांगे, रणजित गव्हाणे, संतोष शिंदे, अनिल पाटील, वासुदेव घाडगे, सुधाकर माने- देशमुख, विशाल घोगरे, अभिजीत निचळ, संतोष सातपुते, संतोष शिंदे, भूषण काळे, उमेश खंडागळे, प्रकाश शेंडगे, मनोज साठे, गोपाल शिंदे, संजय पाटील, रविंद्र शेंडगे, महेंद्र माने, सुभाष तनमोर, शशि साळुंखे, विठ्ठल मलपे, संतोष शेळके, नितिन पाटील, दिपक वाघमारे, कुंडलिक खुर्द यांनी प्रयत्न केले.

# आपण चांगल्या कामाच्या पाठीशी - पालकमंत्री जयकुमार गोरे

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आपण लोक प्रतिनिधी म्हणून काम करतो तेव्हा, चांगलं काम ज्या ठिकाणी चालतं, त्या चांगल्या कामाच्या पाठीशी उभ राहण, आपले कर्तव्य असतं. त्या कर्तव्याच्या भावनेतून, आज या ठिकाणी आलो आहे. म्हणून राहुल जवंजाळ आपण जे काम हातात घेतले आहे ,त्या कामाला, मी माज्या मनापासूनच्या शुभेच्छा देतो असे म्हणून,आपले कोणतेही काम असो, त्या कामात आम्ही आपल्या पाठीशी उभा राहू शकतो. त्या प्रत्येक कामात आम्ही तुमच्या सोबत राहील अशा पद्धतीचा शब्द



देत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी डॉ. राहुल जवंजाळ आणि डॉ. श्रद्धा जवंजाळ यांना शुभेच्छा देत, आपण असेच खूप चांगलं काम करत रहा आणि समाजाच्या उपयोगाला येत रहा, एवढीच अपेक्षा आहे असे म्हणाले.

पिंक रेव्होल्यूशन या संस्थेच्या अध्यक्षा डॉ. श्रध्दा राहुल जवंजाळ यांनी परिचारक यांच्या करीता, निरंतर कार्यशाळेचे आयोजन, स्मुर्ती भवन शंकरनगर - अकलूज येथे केले होते.यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती डॉ. इनामदार डॉ.सतीश दोशी, अनिल पाटील,राहुल जवंजाळ यांची होती तर मोठ्या प्रमाणात परिचारिकाही उपस्थित होत्या.

यावेळी डॉ.इनामदार म्हणाले, नर्सेस आणि नर्सरी बरोबर नसतील तर डॉक्टर तेवढा यशस्वी होणार नाही.माज्या आयुष्यामध्ये सुद्धा नाही. मी सर्वश्रेय माज्या स्टाफला देतो. कारण रुग्णांबरोबर 24 तास डॉक्टर नसतो तर परिचारिका असतात असे डॉ.इनामदार म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ.सतीश दोषी म्हणाले की कॅन्सर म्हणले की सगळ्यांना भीती वाटते. भीती वाटले की मनुष्याचे मनोगत खचून जाते. कॅन्सरने मनुष्य लवकर मरत नाही परंतु त्याच्या भीतीने लवकर मरतो. याकरता मनातून भीती काढून टाकली पाहिजे असे म्हणून त्यांनी जगता आले पाहिजे, जगता आले पाहिजे, ही कविता सादर करून मनुष्याच्या मनातील भीती संपवण्याचा प्रयत्न केला.

यावेळी कार्यक्रमाच्या आयोजिका डॉ. श्रद्धा जवंजाळ यांनी अत्यंत अनमोल असे आपल्या प्रस्थापिकांमधून परिचारकांना मार्गदर्शन केले.

# राजमाता जिजाऊ



१२ जानेवारी १५९८ रोजी
महाराष्ट्रात सिंदखेड नगरी
जन्मले कन्यारत्न शूरवीर
जिजाऊ साहेब जाधवांच्या घरी

इसवी सन १६०५ सा. शुभदिनी
बनल्या शहाजी राज्यांच्या अर्धांगिनी
झुंझार नेतृत्व, रणरागिणी
छत्रपती शिवरायांच्या जननी

महाराष्ट्र भूमी थोर भाग्याची
मिळाल्या शूर वीर माऊली
बनवून शिवरायांना पराक्रमी
स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली

कारभार जहागिरीचा अफाट
आले पेच प्रसंग पदोपदी तरी
नाही डगमगला आपण,दाखवून वाट
पाहिले स्वप्न स्वराज्याचे सोनेरी

टाकला उधळून मुघलांचा डाव
केले रक्षण रयतेचे हरघडी
नाही ठेवला मनी भेदभाव
बसवली स्वराज्याची घडी

सुवर्णमयी युग घडविण्यास
विनंती आऊ साहेब आपणास
यावे आपण पुन्हा जन्मास
प्रार्थना हीच परमेश्वरास

**साधना जगदाळे घाटगे मोहोळ**

# प्रभाग ४ मध्ये अनंत जाधव यांना श्री नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्टचा पाठिंबा; विकासासाठी जनतेचा उत्साह उफाळला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मध्ये अनंत (नेता) जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये जनतेच्या विश्वासाचा ठळक आवाज ऐकायला मिळाला. या मोर्चात विकासासाठी पाठिंबा देत, नागरिकांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

श्री नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्ट यांनी अनंत जाधव यांना जाहीर पाठिंबा जाहीर करत, त्यांच्या सेवाभावी वृत्तीवर भर दिला. ट्रस्टने सांगितले की, 'अनंत जाधव हे जनतेसाठी झटणारे, प्रभागातील विकासासाठी प्रयत्नशील नेता आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली विकासाची वाटचाल सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह राहणार आहे.'






मोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. रस्त्यावर उतरलेल्या जनता एकजूट, विश्वास आणि प्रभागातील विकासाच्या दिशेने ठाम संदेश देत दिसली. नागरिकांनी घोषवाक्यांनी त्यांच्या पाठिंब्याची जाहीरपणे दखल घेतली:

"ही केवळ रॅली नाही, ही जनतेच्या आशेची, हक्कांची वाटचाल आहे."

अनंत जाधव यांनी उपस्थित नागरिकांना संबोधित करत सांगितले, 'सेवेवर विश्वास ठेवून, प्रभागातील प्रत्येक नागरिकाच्या हितासाठी काम करण्याचा आम्ही निर्धार केला आहे. आता निर्णय तुमच्या हातात आहे, विकासासाठी कमळाचं बटण दाबा!'

या रॅलीत नागरिकांनी जनतेच्या आवाजाला दिशा देत, विकासासाठी पाठिंबा व्यक्त केला. तसेच, महिला, तरुण आणि वृद्ध सर्वांनी एकत्र येऊन अनंत जाधव यांच्या नेतृत्वाखाली भक्ती, विश्वास आणि प्रभागाच्या प्रगतीची जाणीव दर्शवली.

शेवटी, या मोर्चातून स्पष्ट झाले की, प्रभागातील जनता त्यांच्या नेता अनंत जाधव यांच्यावर ठाम विश्वास ठेवते आणि विकासासाठी त्यांना संपूर्ण पाठिंबा देण्यास सज्ज आहे.

# सिंहगडमध्ये युवा दिन, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व हुतात्मा दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवा दिन, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती तसेच सोलापूरच्या चार हुतात्म्यांचा हुतात्मा दिन सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर टी व्यवहारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळेस प्रा. माणिक शिंदे, ग्रंथपाल गणेश घोगले, पूनम शिंदे, लिपिक नवनाथ भडंगे, के. बी. झंप्पा, गौर साबळे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



यावेळी स्वातंत्र्यलढ्यात देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, श्रीकिसन सारडा, जगन्नाथ शिंदे आणि अब्दुल रसूल कुर्बानहुसेन यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. १२ जानेवारी १९३१ रोजी ब्रिटिश राजवटीने या चारही देशभक्तांना फाशी दिली होती. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा युवकांवर होणारा प्रभाव, तसेच राष्ट्रमाता जिजाऊंचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान यावर मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी देशभक्ती, शिस्त, कर्तव्यभावना आणि राष्ट्रसेवा या मूल्यांचा अंगीकार करावा, असे आवाहन करण्यात आले.

महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून युवकांमध्ये राष्ट्रप्रेम, प्रेरणा व सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

# सोलापूर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने व्यापक व सुनियोजित तयारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने महापालिकेच्या वतीने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व नियोजनबद्धरीत्या पार पाडण्यासाठी सर्वसमावेशक तयारी करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी शहरात एकूण २६ प्रभाग निश्चित करण्यात आले असून १०९१ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. निवडणूक रिंगणात एकूण ५६४ उमेदवार असून शहरातील एकूण ९,२४,७०६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली असून कायदा व सुव्यवस्था दृष्टीने ४६ मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त व विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.निवडणूक व्यवस्थापनाच्या दृष्टीने ७ निवडणूक निर्णय अधिकारी निहाय ७ ठिकाणी ईव्हीएम मशीनचे वितरण, स्ट्रॉंग रूम तसेच मतमोजणी केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निप्रतिबंधक व्यवस्था व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

निवडणुकीसाठी एकूण १३६५ कंट्रोल युनिट व ३४९४ बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मतदान व मतमोजणी प्रक्रियेबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन टप्प्यांत प्रशिक्षण घेण्यात आले आहे.मतदारांमध्ये जनजागृती वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने बचत गट, शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, मतदार शपथ कार्यक्रम, पथनाट्य तसेच शहरातील प्रमुख ठिकाणी होर्डिंग्स लावून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे.निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी ७ खर्च तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आली असून उमेदवारांच्या खर्चावर काटेकोर नजर ठेवण्यात येत आहे. कायदा व सुव्यवस्था व सुरक्षिततेसाठी एकूण २७४१ पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून त्यामध्ये १५१ पोलीस अधिकारी, १६८० पोलीस हवालदार, तसेच SRPF च्या २ कंपन्या यांचा समावेश आहे.

महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या या सर्व नियोजनामुळे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही शांततापूर्ण, निर्भय व यशस्वीरीत्या पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# स्वामीजींच्या कार्याचे स्मरण म्हणून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना - मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारताच्या वैचारिक पुनर्जागरणाचे महान शिल्पकार होते, त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान, वेदांत आणि अध्यात्माला जागतिक मान्यता मिळवून दिली, त्यामुळे हिंदू धर्म, तत्त्वज्ञान विकासास चालना मिळाली, म्हणून त्यांच्या कार्याचे सतत स्मरण व्हावे या उद्देशाने पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना केली असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्लिश प्राथमिक विद्यालय यांच्या




संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद तसेच राजमाता जिजाबाई यांची जयंती आणि हुतात्मा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सुर्यकांत रूगे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वामी विवेकानंदांचे विचार अध्यात्मापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक परिवर्तनाचेही प्रबळ समर्थक होते. युवकांमध्ये त्यांनी आत्मविश्वास, शिस्त आणि राष्ट्रभक्ती प्रफुल्लित केली शिक्षण, सेवा आणि मानवकल्याण हे त्यांच्या कायार्चे सूत्र होते . त्यांच्या विचारामुळेच देशाचा आत्मसन्मान आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला त्यामुळेच त्यांचे विचार आज भारतीय समाज जोपासत आहे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, कुमारी अक्षता साठे हिने राजमाता जिजाबाईच्या वेशभूषा मध्ये होय मी जिजाऊ बोलते यावर भाषण केले. यावेळी इ. 9 वी तील अपेक्षा शिंदे, ऐश्वर्या माळी, प्रीती फुलारी, संस्कृती क्षीरसागर, स्नेहा देडे, अक्षता साठे व धानेश्वरी बगले या मुलीनी पोवाडा सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार सुर्यकांत रूगे यांनी मानले.

**जिजाबाईंचे राष्ट्र निर्माण मध्ये उल्लेखनीय योगदान**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाईचे जीवन मातृत्व, त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक होते. राष्ट्रनिर्माण मध्ये त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले म्हणूनच आजही आदर्श माता म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले जाते असे गौरवोद्गार कल्याणशेट्टी यांनी काढले.

**हुतात्म्यांचे कार्य वंदनीय**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी प्राणाची आहुती देणारे मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकिशन सारडा, कुर्बान हुसेन यांचे कार्य वंदनीय असून त्यांचा त्याग समाज विसरणार नाही, असे यावेळी आपल्या भाषणातून कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# प्रभाग २२ मध्ये पालकमंत्री गोरे यांच्या उपस्थितीत किसन जाधव पॅनलचा महाशक्तीप्रदर्शन रोडशो

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक २२ मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नटगिरी, अंबिका नागेश गायकवाड व चैत्राली गायकवाड यांच्या प्रचारार्थ काढलेला भव्य रोडशो म्हणजे जणू विजयाचा गुलाल उधळणारी विजयदर्शी पदयात्राच ठरली. रामवाडी शासकीय गोदामापासून सोनी नगर, रेवणसिद्धेश्वर नगर, विजापूर नाका मार्गे रामवाडी मुख्य रस्त्यापर्यंत निघालेल्या या पदयात्रेत हजारो महिलांनी हातात भाजपचे झेंडे घेऊन उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि



अवघा परिसर भगवामय झाला. या शक्तीप्रदर्शनात पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, भाजप युवा नेते मनीष देशमुख व मोनिका देवेंद्र कोठे यांची उपस्थिती विशेष ठरली. विकास म्हणजे भाजप आणि भाजप म्हणजे विकास. प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ठाम ग्वाही पालकमंत्री गोरे यांनी देत किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या पाठीशी भाजप सरकार खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट केले. आमदार देवेंद्र कोठे यांनीही जाधव पॅनलला मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. किसन जाधव म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रभाग २२ साठी भरघोस निधी मंजूर केला असून पालकमंत्री गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली प्रभागाचा विकास आता थांबणार नाही. मोनिका कोठे यांनी या पदयात्रेला प्रत्यक्ष विजययात्रा संबोधले.

लक्ष्मण मामा जाधव व माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या रोडशोला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद, विशेषतः महिलांची विक्रमी उपस्थिती, शहरातील इतर कोणत्याही प्रभागात न पाहिलेला असल्याची चर्चा आहे. यावरून किसन जाधव व नागेश गायकवाड यांचे वर्चस्व स्पष्ट होत असून भाजपाचे चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे.

# ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेला विधिवत प्रारंभ

## शिंदे पितापुत्रींनी नंदीध्वजांचे घेतले दर्शन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यांच्या वार्षिक यात्रेला आज पारंपरिक यण्णीमज्जन विधीने विधिवत आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यात्रेच्या पहिल्या दिवशी श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या योगदंडाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या नंदीध्वजांचे पूजन मल्लिकार्जुन मंदिराजवळील हिरेहब्बू वाडा येथे पारंपरिक रितीरिवाजांनुसार करण्यात आले.

या पवित्र प्रसंगी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे तसेच आमदार प्रणिती शिंदे यांनी आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित राहून नंदीध्वजांचे पूजन केले व श्री सिद्धरामेश्वर महाराजांचे दर्शन घेतले. त्यांच्या उपस्थितीमुळे यात्रेच्या प्रारंभाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. पूजनानंतर नंदीध्वज सोलापूर शहराच्या पंचक्रोशीतून नियोजित मार्गाने श्री सिद्धरामेश्वर मंदिराकडे प्रस्थान करणार आहेत. मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर नंदीध्वजांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यानंतर ६८ लिंगांना तैलाभिषेक हा महत्त्वाचा धार्मिक विधी संपन्न होणार आहे. या विधीसाठी भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे.

श्री सिद्धरामेश्वर यात्रेला प्रारंभ होताच संपूर्ण सोलापूर शहरात भक्तिमय व उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरासह परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने यात्रेत सहभागी होत असून, विविध धार्मिक विधी, दर्शन व कार्यक्रमांसाठी मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या वेळी यात्रेचे मानकरी हिरेहब्बू व देशमुख परिवार, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, राहुल वर्धा यांच्यासह हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेच्या सुरळीत आयोजनासाठी मंदिर समिती, प्रशासन व स्वयंसेवकांकडून योग्य नियोजन करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी आ. अभिजीत पाटील मैदानात

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या काही दिवसांमध्येच निवडणुका लागणार असल्याने पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन तथा माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी भाळवणी, रोपळे, गोपाळपूर, वाखरी या गटांतील प्रत्येक गावांमध्ये घोंगडी बैठका घेत कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी समजून घेत आहेत.

कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले असून आमदार अभिजीत पाटील यांचे गावोगावी जंगी स्वागत करण्यात आले. यामुळे कार्यकर्त्यांना बळ मिळाले असून सर्व ताकदीने आपण



निवडणूक लढवणार असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

सध्या आमदार अभिजीत पाटील यांनी गाव दौरे सुरू करून ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेत आहेत. आपल्यातीलच इच्छुक उमेदवार कोण असावा याबाबतचा चाचपणी करत आहेत. नागरिकांना जो हवा असलेला उमेदवार तोच दिला जाईल.जनतेची कामे करणारा

> मी जरी माढा मतदारसंघात निवडून आलो असलो तरी विठ्ठल कारखान्याच्या कार्यक्षेत्र हे संपूर्ण पंढरपूर तालुका असून माझ्यासाठी आमदारकीच्या विजयामध्ये रात्रीचा दिवस करणारे त्यांच्यासाठी मी रात्रीचा दिवस करून त्यांच्यासाठी ही निवडणूक लढवणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. आपल्याच विचाराचा जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य दिल्याने विकास कामांना नक्कीच गती मिळेल.
>
> **अभिजीत पाटील,** आमदार, माढा विधानसभा

जनतेची सेवा करणारा आपल्यातील युवकांना संधी देण्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

गाव दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळत असून तुम्ही जो उमेदवार द्याल तो आम्हाला मान्य असेल आम्ही त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करीन असा शब्दही नागरिकांनी आमदार अभिजीत पाटील यांना यावेळी दिला.

यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अनेक आजी माजी संचालक व भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक, विविध सोसायटीचे चेअरमन, ग्रामपंचायतचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य तंटामुक्त अध्यक्ष गाव पोलीस पाटील अनेक जण यावेळी उपस्थित होते.

जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७ /मोप्र- १ दिनांक १८/१०/२०२३

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर तालुका माढा जिल्हा सोलापूर**
**ईमेल:** eeudmd@yahoo.co.in, **दूरध्वनी क्र-२३६५१२, फॅक्स ०२१८३-२३६५५१**

**ई-निविदा सूचना क्र. ३ सन २०२५-२६ ( दुबार मागणी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यातयेईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रूपये |
|---|---|---|---|
| ३ | उजनी धरणाच्या उजव्या बाजूकडील राष्ट्रीय महामार्ग ६५ ते धरण पोहोच रस्त्याचे दुरुस्ती व डांबरीकरण करणे. | सोलापूर | ३१.९६ लक्ष |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दिनांक १६/०१/२०२६ ते दिनांक २३/०१/२०२६
ई-निविदा उघडण्याचा दिनांक २७/०१/२०२६

जा.क्र.उधव्यवि/लेशा/ ११७ / सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भीमानगर
दि. ८/०१/२०२६

जिमाका/सो/जाहि/३०७/२०२५-२६

**सही/-**
**(सु.उ. डुंबरे)**
**कार्यकारी अभियंता**
**उजनी धरण व्यवस्थापन विभाग**

# लोभा मास्तर चाळीच्या गणपती मंदिरात शिंदेंनी केली महाआरती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ७ मधील प्रचाराला सुरुवात करताना लोभा मास्तर चाळ येथील राजराजेश्वर गणपती मंदिरात आज सकाळी भक्तिभावपूर्ण वातावरणात महाआरती आयोजित करण्यात आली.

या महाआरतीला सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणूक रिंगणातील अमोल (बापू) शिंदे, अनिकेत शिवाजीराव पिसे, मनोरमा ज्ञानेश्वर सपाटे व मा. मनिषा विशाल कणसे यांच्यासह संतोष भाऊ पवार, राजन भाऊ जाधव, शंतनु दादा साळूंके, विशाल कणसे, संजू भाऊ पवार आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ही महाआरती राज सिताराम आबा पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी गणरायाचे पूजन करून प्रचार कायार्साठी यश, एकता व लोककल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.

कार्यक्रमास राजराजेश्वर गणपती मंडळाचे आधारस्तंभ बाळासाहेब आप्पा पुणेकर, सिताराम आबा पुणेकर, सुशांत भैया पुणेकर, कुमार पुणेकर, प्रशांत पुणेकर, समाधान पुणेकर, तसेच रणजीत डोंगरे, दयानंद शिंदे, सुजित खुर्द, हरिश सिद्धे, प्रकाश शिंदे, रोहन काटे, सोहम काटे, शिवराज कलशेट्टी, परेश खराडे, भिमराव जाधव, सोमनाथ घुले, प्रकाश चेंडके, प्रशांत गवळी, अमोल गवळी, विशाल मस्के, लखन पवार, खंडू मामा साबळे, गोकूळ सिरसट, प्रज्वल निकम, कृष्णा ढोबळे, मनोज दिघे, अभिजित पवार, राम गायकवाड आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाआरतीनंतर उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांशी संवाद साधत विकासात्मक मुद्द्यांवर चर्चा केली. लोकाभिमुख व पारदर्शक प्रशासन देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या धार्मिक व सामाजिक उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून निवडणूक प्रचाराला उत्साहपूर्ण प्रारंभ झाल्याचे चित्र दिसून आले.

## ‘जिजा माउली गे तुला वंदना ही...’

# मातृतीर्थ सिंदखेडराजामध्ये जिजाऊ जयंतीचा उत्साह

### मराठा सेवा संघाच्या वतीने आंतरराष्ट्रीय जिजाऊ जन्मोत्सव सोहळा; लाखों भाविकांची उपस्थिती

### पहाटेपासून जिजाऊ भक्तांची मांदियाळी









**बुलढाणा / सिंदखेड राजा (कटूसत्य वृत्त):-** स्वराज्य जननी, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा ४२८ वा जन्मोत्सव मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा होत आहे. मराठा सेवा संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ११ व १२ जानेवारी २०२६ रोजी जिजाऊ जन्मोत्सवाचा भव्य आंतरराष्ट्रीय सोहळा आयोजित करण्यात आला असून, देश-विदेशातून आलेल्या लाखों जिजाऊ भक्तांनी या पवित्र भूमीत हजेरी लावली आहे.

राजमाता जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या राजे लखोजी जाधव यांच्या राजवाड्यात आज पहाटे सूर्योदयावेळी जिजाऊंच्या वंशज शिवाजी राजे जाधव यांच्या हस्ते विधिवत प्रार्थना व अभिवादन करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर ‘जिजाऊ माता की जय’च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

जिजाऊ जयंतीनिमित्त सिंदखेड राजा येथे पहाटेपासूनच जिजाऊ भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महिलांसह तरुण, वारकरी, विद्यार्थी, अभ्यासक व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनीही राजमाता जिजाऊंना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित या जन्मोत्सवाची सुरुवात ११ जानेवारी रोजी सायंकाळी राजवाड्यातील भव्य दीपोत्सवाने झाली. त्यानंतर जिजाऊ सृष्टी ते राजवाडा अशी जिजाऊ ब्रिगेडच्या ४२८ महिलांची मशाल यात्रा काढण्यात आली. या यात्रेने संपूर्ण परिसरात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

यानंतर जिजाऊ सृष्टी येथे देशातील विविध राज्यांतून आलेल्या महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

१२ जानेवारी रोजी सूर्योदयापूर्वी राजवाड्यात दहा जोडप्यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. सकाळी सात वाजता राजवाडा ते जिजाऊ सृष्टी अशी भव्य वारकरी दिंडी निघाली. सकाळी नऊ वाजता जिजाऊ सृष्टी येथे शिवधर्म ध्वजारोहण करण्यात आले. दिवसभर जिजाऊ सृष्टीवर व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर उपक्रम सुरू होते.

जिजाऊ जन्मोत्सवाचे वैशिष्ट्य ठरलेले प्रबोधनात्मक पुस्तक प्रदर्शन यंदाही लक्षवेधी ठरले. तब्बल ४०० हून अधिक पुस्तक स्टॉल्स उभारण्यात आले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही कोट्यवधी रुपयांची पुस्तक विक्री झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

सायंकाळी मराठा सेवा संघाचे संस्थापक ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अंतिम कार्यक्रम पार पडला. यावेळी मराठा सेवा संघाच्या सर्वोच्च पुरस्कारांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, उद्योजक कक्ष यांच्यासह संघटनेच्या ३२ कक्षांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा ऐतिहासिक जन्मोत्सव सोहळा अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

राजमाता जिजाऊंच्या विचारांचा जागर, स्वराज्याची प्रेरणा आणि मातृशक्तीचा जागर घडवणारा हा जन्मोत्सव सोहळा सिंदखेड राजा नगरीत पुन्हा एकदा इतिहास घडवून गेला.

# जिल्हा परिषद निवडणुकीला मुदतवाढ

### 15 फेब्रुवारीपर्यंत निवडणुका घेण्याचे कोर्टाचे निर्देश




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील स्थानिक राजकारणाची घडी पुन्हा एकदा बदलणारी घडामोड समोर आली आहे. अनेक दिवसांपासून रखडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत आता नवी वेळापत्रकाची दिशा ठरली आहे.

प्रशासकीय आणि कायदेशीर गुंतागुंतीमुळे लांबलेल्या या प्रक्रियेला अखेर न्यायालयीन हस्तक्षेपातून दिलासा मिळाला आहे.

**जिल्हा परिषद निवडणुकांना पुन्हा ब्रेक**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ देण्यात यावा, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाने सुप्रीम कोर्टाकडे केली होती. त्यावर झालेल्या सुनावणीत आयोगाला 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. आता या निवडणुका 15 फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

**आधीची डेडलाईन 31 जानेवारी**

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारीपूर्वी घेण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका पार पडल्या, तर महापालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया सध्या सुरू आहे. मात्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी प्रशासकीय कारणांमुळे अडथळे निर्माण झाल्याने 10 फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची विनंती आयोगाने केली होती.

**12 झेडपी, 125 पं. समित्यांना दिलासा**

न्यायालयीन सुनावणीनंतर 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या 125 पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे या भागातील निवडणूक प्रक्रिया आता फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**सोलापूरमधून दाखल झालेली याचिका**

सोलापूर जिल्ह्यातील कुडुर्वाडी येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती मेंबर्स असोसिएशनचे पदाधिकारी कैलास गोरे यांनी सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र याचिका दाखल केली होती. नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच 50 टक्के आरक्षण मयार्दा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन अंतिम निर्णयाच्या अधीन राहून घ्याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

**ओबीसी आरक्षण, 50 टक्के मर्यादेचा वाद**

ओबीसींना सरसकट 27 टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर सुरुवातीला सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 50 टक्के आरक्षण मर्यादेतच घेण्याचे आदेश देण्यात आले होते. पुढे न्यायालयाने काही अटींवर नगरपालिका, नगरपंचायती तसेच नागपूर आणि चंद्रपूर महापालिकांच्या निवडणुकांना परवानगी दिली. मात्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या बाबतीत ही प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची ठरली.

**विदर्भ-मराठवाड्यात अडथळे**

पश्चिम महाराष्ट्रातील 12 जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद निवडणुका होत असताना, 50 टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्यामुळे उर्वरित 20 जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यास आयोगाने असमर्थता दर्शवली होती. या 20 पैकी बहुतांश जिल्हा परिषदा विदर्भ आणि मराठवाडा विभागातील असल्याने, तेथील आरक्षणाचा प्रश्न निकाली निघेपर्यंत निवडणुका शक्य नसल्याची भूमिका आयोगाने घेतली आहे.

**15 फेब्रुवारीपर्यंत निवडणुका होणार?**

आता सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार 15 फेब्रुवारीपर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे आव्हान राज्य निवडणूक आयोगासमोर आहे. आरक्षणाचा गुंता आणि प्रशासकीय तयारी या दोन्ही आघाड्यांवर तोडगा निघतो का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग क्रमांक ७ मध्ये शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसची भगवी लाट

## अमोल बापू शिंदे, अनिकेत दादा पिसे, मनोरमाताई सपाटे व मनिषाताई कणसे यांच्या रॅलीला युवक व लाडक्या बहिणींचा तुफान प्रतिसाद





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ७ मध्ये शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस (मित्र पक्ष) यांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या भव्य पदयात्रेत भगवी लाट उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अमोल बापू शिंदे, युवानेते अनिकेत दादा पिसे, मनोरमाताई सपाटे व मनिषाताई कणसे यांच्या प्रचारार्थ रविवारी ही भव्य रॅली काढण्यात आली.

पदयात्रेची सुरुवात थोरला मंगळवेढा तालीम येथील गणरायाच्या पूजनाने करण्यात आली. यानंतर ही रॅली थोरला मंगळवेढा तालीम, पंजाब तालीम, बाबा कादरी मस्जिद, जुने श्रीराम मंदिर, टोळाचे बोळ, चौपाड विठ्ठल मंदिर, काळी मशीद, बाजीअण्णा मठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, निराळे वस्ती, अवंती नगर, अभिषेक नगर यासह प्रभागातील सर्व भागांमधून मार्गक्रमण करत पुढे गेली.

या पदयात्रेत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, युवासेना, महिला आघाडी, कामगार सेना, विधी सेवा समिती तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, शिवसैनिक, थोरला मंगळवेढा तालीमचे सदस्य, संकेत परिवार, अमोल बापू शिंदे मित्रपरिवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे लाडक्या बहिणींची उपस्थिती लक्षणीय होती.

‘जय भवानी जय शिवाजी, जय महाराष्ट्र, शिवसेना जिंदाबाद, राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय असो, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, एकनाथ शिंदे-अजितदादा पवार तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, निवडून येणार कोण? धनुष्यबाण आणि घड्याळाशिवाय दुसरा कोण?ह्व अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. ‘काय बोलणार तर विकासकामे बोलणार’ हा स्पष्ट संदेश या पदयात्रेतून देण्यात आला.


पदयात्रेदरम्यान विविध ठिकाणी उमेदवारांचे औक्षण करून त्यांना आशीर्वाद देण्यात आले. अनेक नागरिकांनी पुष्पहार, पुष्पगुच्छ, पेढे देत उमेदवारांचे जंगी स्वागत केले. एकनाथ शिंदे जिंदाबाद, शिवसेना जिंदाबाद अशा घोषणांमुळे संपूर्ण वातावरण चैतन्यमय झाले होते.

यावेळी बोलताना अमोल बापू शिंदे म्हणाले की, आपण केलेल्या विकासकामांची पावती सुज्ञ मतदार राजा नक्कीच देईल. तसेच लाडक्या बहिणी आपल्या पाठीशी ठामपणे उभ्या राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पदयात्रेला युवकांचा तसेच महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाल्याने शिवसेना-राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या रॅलीमध्ये शिवसेना संपर्कप्रमुख संजय कदम, जेष्ठ नेते राजन भाऊ जाधव, महिला आघाडी जिल्हाप्रमुख मुबीनाताई मुलाणी, शहरप्रमुख जयश्रीताई पवार, ज्ञानेश्वर सपाटे, संकेत भाऊ पिसे, प्रकाश अवस्थी, पृथ्वीराज दीक्षित, विशाल कणसे, शंतनू साळुंखे, पृथ्वीराज पवार, माधव खरसडे, हनुमंत बेसुळके, दिनेश चौगुले, मनोज सरवदे, शिवाजी भोसले, सौदागर मामा सावंत यांच्यासह शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व हजारोंच्या संख्येने माता-भगिनी व बंधू सहभागी झाले होते.

या पदयात्रेमुळे प्रभाग क्रमांक ७ मध्ये शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मिळणारा वाढता जनसमर्थन स्पष्टपणे दिसून आला.

# शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या आशीर्वादाने समाजाच्या सर्व थरातील जनतेंनी घड्याळ चिन्हाला पाठिंबा दिल्याचा बंदपट्टेंना विश्वास




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजाच्या सर्व थरातील सामान्य माणसाच्या मनात स्थान निर्माण करणारा उमेदवार म्हणजे सीए सुशील चंदू बंदपट्टे असून, येत्या १५ तारखेला त्यांच्या नावासमोरील घड्याळ चिन्हाचे बटण दाबून त्यांना विजयी करण्याचा प्रभाग ४ मधील मतदारांनी निर्धार केला आहे. ‘खबर पक्की... बदल नक्की’ असा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना युतीच्या अधिकृत उमेदवार सीए सुशील बंदपट्टे यांनी व्यक्त केला.

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराज यांच्या ६८ शिवलिंग प्रदक्षिणा महायात्रा महोत्सवाच्या निमित्ताने प्रभाग ४ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सीए सुशील बंदपट्टे यांनी सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. या धार्मिक व सांस्कृतिक वातावरणात नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका मांडली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना युतीचे अधिकृत उमेदवार कविता आनंद चंदनशिवे, सीए सुशील चंदू बंदपट्टे, सारिका विवेक फुटाणे व विश्वनाथ दत्तात्रय बिडवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी ह्वकामाचा माणूस, आपला माणूसह्व अशी भावना व्यक्त करत सीए सुशील बंदपट्टे यांच्या कार्यशैलीवर विश्वास दाखवला.

या प्रसंगी बोलताना उमेदवारांनी सांगितले की, प्रभाग ४ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा, पारदर्शक कारभार व विकासाची ठोस दिशा देण्यासाठी युती कटिबद्ध आहे. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून काम करणारे नेतृत्व प्रभागाला मिळावे, हीच जनतेची अपेक्षा असून ती पूर्ण करण्यासाठी घड्याळ चिन्हाला भरघोस पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

महायात्रा महोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि लोकशाही प्रक्रियेचा उत्साह एकत्र अनुभवायला मिळाला असून, प्रभाग ४ मध्ये परिवर्तन निश्चित असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंती - पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रमांचा समारंभ




**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात सहकार चळवळीचे जनक व दूरदृष्टी नेतृत्व लाभलेले सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब निकम यांच्या शुभहस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमांचे पूजन करून करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. पुष्पा सस्ते उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद तसेच सोलापूर जिल्ह्यातील चार हुतात्मे यांच्या जीवनकायार्चा आढावा घेत त्यांच्या विचारांचे आजच्या तरुण पिढीसाठी असलेले महत्त्व विशद केले. सहकार, राष्ट्रभक्ती, त्याग, सामाजिक बांधिलकी व चारित्र्यनिर्मिती या मूल्यांचा स्वीकार करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.


कार्यक्रमास महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. उत्तम सावंत, तसेच प्रा. जे. डी. मुळीक, प्रा. एस. एच. पवार, प्रा. डॉ. सुनिता सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. वैभव गवळी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एन. डी. देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. एच. जे. मोगल यांनी केले. या कार्यक्रमास सांस्कृतिक विभागातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निमित्ताने विद्यार्थ्यामध्ये सहकार चळवळीची जाणीव निर्माण होऊन सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रप्रेमाची भावना वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

महाविद्यालयामध्ये सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांअंतर्गत क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब निकम यांनी दिली.

# ‘आरक्षणविरोधकांना मतदान करू नका’ मराठा समाजाला जरांगे पाटलांचा कडवा संदेश



**बुलढाणा / सोलापूर (कटूसत्य वृत्त):** राज्यात सध्या महापालिका निवडणुकांची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून, येत्या १५ जानेवारी रोजी राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी महापालिका निवडणुकीसंदर्भात प्रथमच थेट आणि स्पष्ट भूमिका जाहीर केली असून, त्यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची चिन्हे आहेत.

बुलढाणा येथे आयोजित सभेत बोलताना जरांगे पाटील यांनी मराठा समाजातील मतदारांना आवाहन करताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘जे नेते आणि पक्ष मराठा आरक्षणाच्या विरोधात उभे राहिले, तेच आज महापालिका निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे आहेत. अशा लोकांना कोणत्याही परिस्थितीत मतदान करू नका.’

आपल्या भाषणात जरांगे पाटील यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका करताना म्हटले की, ‘या सरकारने मराठे, मुस्लिम आणि दलित समाजाला काडीला लावून टाकले आहे. त्यामुळे आता मराठ्यांनी फक्त शांत राहण्याची भूमिका न घेता कट्टर आणि कडवट भूमिका घ्यावी. इतकी खुन्नस ठेवली पाहिजे की, यांना मतदानच मिळू नये.’

निवडणूक काळातील कथित पैशांच्या वापरावरही त्यांनी गंभीर आरोप केले. ‘निवडणुकीत पैसे वाटल्याचा आरोप होत नाही, तर पैसे वाटलेच जात आहेत. यांच्याकडे प्रचंड पैसा आहे. आधी यांच्याकडे काय होतं आणि आता काय आहे, हे जनतेला दिसत आहे. शर्टामधून दिसतील इतकी नोटांची बंडलं घेऊन फिरतात, नोटा वाटतात आणि घोळ घालतात,’ असा आरोप जरांगे पाटील यांनी केला.

महापालिका निवडणुकांतील राजकीय युतींवर टीका करताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘कुठे राष्ट्रवादीसोबत जमतं, कुठे भाजप-शिवसेनेसह, तर कुठे काँग्रेससोबतही युती होते. म्हणजे भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना हे सगळे एकत्रच आहेत. मग यांचे शत्रू कोण? आम्हीच ना गोरगरीब जनता?’

‘आपल्या पक्षाचा नेता निवडून यायला हवा, मग युती कुणासोबतही करा, हाच यांचा अजेंडा आहे. लोकांना वाटतं की पर्याय नाहीत. पण लोकांना एकदा पर्याय मिळू द्या, मग जनता यांना कसं उलटंपालटं करते ते बघा,’ असे आव्हानात्मक विधान त्यांनी केले.

आपली भूमिका स्पष्ट करताना जरांगे पाटील यांनी सांगितले की, ‘मी जिल्हा परिषद, नगरपालिका किंवा स्थानिक पातळीच्या निवडणुकीत थेट पडत नाही. पण जर एखाद्या सत्ताधाऱ्याला माज आला असेल, तर तो माज उतरवल्याशिवाय मी गप्प बसत नाही. आपल्याला टप्पू मासा लागतो, तो लागलाच पाहिजे,’ असे सूचक विधान त्यांनी केले.

मनोज जरांगे पाटील यांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे महापालिका निवडणुकीत विशेषतः मराठा समाजाच्या मतांवर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत. आरक्षण, पैसा आणि युतीच्या राजकारणावर केलेली ही टीका निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात मोठा प्रभाव टाकू शकते.

राज्यातील महापालिका निवडणूक निकालांमध्ये या आवाहनाचा किती परिणाम होतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.